दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. १६ जुलै २०२६

**नीरा स्नानाचा दिव्य सोहळा :** पालखी सोहळ्यातील नीरा स्नानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पालखी प्रवासाचा अर्धा टप्पा पूर्ण झाल्यानंतर पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील नीरा नदीच्या प्रसिद्ध दत्तघाटावर ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना स्नान घालण्याची परंपरा शतकानुशतके अखंड सुरू आहे. दुपारचे भोजन आणि विसावा झाल्यानंतर सोहळा दत्तघाटाकडे मार्गस्थ झाला. नीरा नदीवरील शंभर वर्षांचा इतिहास साक्षीदार असलेल्या ब्रिटिशकालीन पुलावरून पालखीचा वैभवी लवाजमा पुढे सरकत होता. सर्वात पुढे तुतारीचा मंगल नाद, त्यामागे मानाचे अश्व, भगव्या पताका, विणेकरी वारकरी आणि फुलांनी सजलेला माऊलींचा रथ... मंद वाऱ्याच्या साक्षीने हा अविस्मरणीय देखावा भक्तांच्या डोळ्यांत साठून राहिला.





## ‘माऊली...माऊली’च्या अखंड जयघोषात

# ज्ञानदेवांच्या पादुकांचे शाही स्नान

### पुणे जिल्ह्याचा भावपूर्ण निरोप, साताऱ्यात भक्तिभावाने स्वागत

**नीरा (दै. संध्या)**

"नीरा भिवरा पडता दृष्टी,
स्नान करिता शुद्ध सृष्टी;
अंती तो वैकुंठप्राप्ती,
ऐसे परमेष्ठी बोलिला..."

या संतवचनांचा प्रत्यय बुधवारी नीरा नगरीत आला. टाळ-मृदंगाच्या अखंड गजरात, "माऊली... माऊली..."च्या निनादाने आसमंत दुमदुमून गेला आणि नीरा नदीच्या पवित्र तीर्थात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे शाही स्नान मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाले. या दिव्य सोहळ्यानंतर माऊलींची पालखी पुणे जिल्ह्याचा निरोप घेऊन पालखी सोहळ्याचे प्रणेते हैबतबाबांच्या जन्मभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यातील लोणंद मुक्कामाकडे मार्गस्थ झाली.

बुधवारी पहाटे वाल्हे नगरीचा निरोप घेत माऊलींच्या पालखी सोहळ्याने लोणंदच्या दिशेने प्रस्थान केले. सकाळी आठ वाजता पिंपरे (खुर्द) येथील अहिल्याबाई होळकर विहिरीसमोर न्याहरीसाठी विसावा घेण्यात आला. पिंपरे आणि पिसुर्टी ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. बेसन-भाकरी, विविध चटण्या, खरडा, ताज्या रानभाज्या आणि प्रेमाची शिदोरी घेऊन ग्रामस्थ वारकऱ्यांच्या सेवेसाठी धावून आले होते. भक्ती आणि सेवाभावाचा हा सुंदर संगम पाहून प्रत्येक वारकरी भारावून गेला.

यानंतर पालखी सोहळा दुपारच्या भोजनासाठी नीरा नगरीत दाखल झाला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे, माजी सभापती दत्ताजी चव्हाण, विराज काकडे ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी फुलांच्या वर्षावात माऊलींचे स्वागत केले. ग्रामपंचायतीने पालखी तळाची आकर्षक फुलांनी सजावट केली होती. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावत माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले आणि भक्तीच्या महासागरात स्वतःला अर्पण केले.

पैलतीरावर सोहळ्याचे मालक, विश्वस्त आणि मानकरी यांच्या उपस्थितीत दत्तघाटावर "माऊली... माऊली..."च्या अखंड गजरात ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना पवित्र तीर्थात शाही स्नान घालण्यात आले. हा दैवी क्षण अनुभवण्यासाठी दत्तघाट आणि नदीचा संपूर्ण परिसर भाविकांनी अक्षरशः फुलून गेला होता. या प्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. शिवमकुमार, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, जेजुरीचे पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील, बांधकाम सभापती दीपाली हुलावळे, प्रमोदकाका काकडे, दत्ताजीराव चव्हाण, तेजश्री काकडे, राजेश काकडे, राजेश चव्हाण, विराज काकडे, विजय शिंदे, आरोग्य उपसंचालक भगवान पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी माऊलींच्या पालखीला पुणे जिल्ह्याच्या वतीने भावपूर्ण निरोप दिला.

भक्ती, परंपरा, सेवा आणि संस्कृतीचा अद्वितीय संगम अनुभवत "माऊली... माऊली..."चा अखंड गजर करीत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा आता साताऱ्याच्या भूमीत पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाला. नीरा नदीच्या पवित्र तीर्थात पार पडलेला हा शाही स्नान सोहळा वारकरी संप्रदायाच्या अखंड भक्तीपरंपरेचा अविस्मरणीय अध्याय ठरला.

### सातारा जिल्ह्याचे भक्तिभावाने स्वागत

नीरा नदी ओलांडताच सातारा जिल्ह्याच्या वतीने माऊलींचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पालकमंत्री शंभुराज देसाई, शिवेंद्रराजे भोसले, मकरंद पाटील, जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्षा प्रिया शिंदे, कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, जिल्हा पोलीस प्रमुख निखील पिंगळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, तहसीलदार सुहास थोरात, गटविकास अधिकारी अनिलकुमार वाघमारे, विजय धायगुडे, रघुनाथ धायगुडे यांच्यासह मान्यवरांनी माऊलींचे भक्तिभावाने स्वागत केले.



### ४८ हजार कोटींचे जुने वीज बिल माफ; कर्जमाफीनिमित्त सत्कारावेळी मोठी घोषणा

# शेतकऱ्यांची पाटी कोरी करणार!

**मुंबई (दै. संध्या)**

राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईत विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील बळीराजासाठी आणखी दोन अत्यंत मोठ्या घोषणा केल्या. साडेसात हॉर्सपॉवर (7.5 HP) पर्यंतच्या कृषी पंपांचे तब्बल 48 हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल सरकार पूर्णपणे माफ करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. तसेच, लवकरच राज्यातील 100 टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज पुरवली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी कशा आणि का काढल्या, यावरही सविस्तर भाष्य केले.

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती देताना मुख्यमंत्र्यांनी सर्वात मोठी घोषणा वीज बिलासंदर्भात केली. साडेसात हॉर्सपॉवरपर्यंतच्या कृषी पंपांचे सध्याचे वीज बिल सरकारने आधीच माफ केले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या नावावर जुनी थकीत बिले कागदोपत्री तशीच होती. यामुळे नवीन कनेक्शन घेताना किंवा इतर कामांत शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. ही अडचण दूर करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांचे तब्बल 48 हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल सरकार पूर्णपणे माफ करणार आहे.

"शेतकऱ्याच्या डोक्यावर जुन्या बिलांची टांगती तलवार नको, त्यांची पाटी पूर्णपणे कोरी झाली पाहिजे," या उद्देशाने हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

वीज बिल माफ केले म्हणजे वीज कंपनी स्वतःच्या खिशातून पैसे भरत नाही. सर्वसामान्यांच्या बिलावर हा भार पडू नये म्हणून, राज्य सरकार दरवर्षी अर्थसंकल्पातून 25 हजार कोटी रुपये वीज वितरण कंपनीला देत असल्याचे त्यांनी सांगितले.

रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देताना शेतकऱ्यांना सर्पदंश आणि इतर अनेक जीवघेण्या संकटांचा सामना करावा लागतो. यातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी सरकारने 'सौर कृषी वाहिनी' आणि 'सौर पंप' योजना आणल्या आहेत. सध्या राज्यातील 76 टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात आहे. या वर्षाअखेरपर्यंत हे प्रमाण 100 टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. आगामी काळात राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा 8 ते 12 तास पूर्णपणे मोफत वीज पुरवली जाईल, असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला. दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी आणि नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान, या योजनेची अंमलबजावणी करताना सरकारने सुरुवातीला काही अटी घातल्या होत्या. मात्र, आमदारांच्या आग्रहानंतर त्या अटी रद्द करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आर्थिक शिस्त लागावी म्हणून 2019च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्यांना या नवीन योजनेतून वगळण्यात आले होते. मात्र, महायुतीच्या 25-30 आमदारांनी (आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली) मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ही अट रद्द करण्याची विनंती केली. यामुळे 12 लाख शेतकरी वंचित राहिले असते. आमदारांचा आग्रह योग्य वाटल्याने सरकारने ही अट रद्द केली.

# दिल्ली हायकोर्टाकडून सरकारला नोटीस

### सोनम वांगचुकांची प्रकृती खालावली, उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

थ्री इडियट चित्रपटात आमीर खानने ज्यांची भूमिका साकारली ते सोनम वांगचुक थ्री इडियट चित्रपटाच्या माध्यमातून देशाच्या घराघरात पोहोचले आहेत. तर, रॅमन मॅगसेसे पुरस्कार पटकावल्याने त्यांचं कार्य देखील देशाला परिचीत आहे. मात्र, देशात झालेल्या नीट पेपर फुटीच्या घटनेविरोधात शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सध्या दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर त्यांचं आमरण उपोषण सुरू आहे. गेल्या 18 दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग केल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. गेल्या 18 दिवसात त्याचं वजन 8 किलोहून अधिक कमी झालं आहे. मात्र, सरकारने अद्याप कुठलीही दखल न घेतल्याने आता हे आंदोलन थेट कोर्टात पोहोचलं आहे.

सोनम वांगचूक यांच्या प्रकृतीची चिंता व्यक्त करत ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेंनीही सोनम वांगचूक यांना फोन करुन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. तसेच, अनेकांकडून वांगचूक यांच्या प्रकतीची काळजी व्यक्त करत उपोषण मागे घेण्याची विनंती केली जात आहे. तर, दिल्लीतील वकील राकेश कुमार सैनी यांनी वांगचूक यांनी उपोषण सोडावं म्हणून जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेत वांगचुक यांचा 'जीव वाचवण्यासाठी सरकारकडून तातडीनं दखल' घेण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. आता, न्यायालयाने याचिकेवर सुनावणी करताना केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. सोनम वांगचुक यांच्यासाठी तातडीने वैद्यकीय उपचार, जीवनरक्षक मदत आणि आवश्यक पोषण पुरवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. त्यासोबतच सरकारने त्यांच्या आंदोलकांशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा सुरू करावी, जेव्हा एखाद्या व्यक्तीचा जीव धोक्यात असतो, तेव्हा सरकार गप्प बसू शकत नाही. शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे किंवा उपोषण करणे हा नागरिकांचा अधिकार आहे, परंतु त्याचवेळी आपल्या नागरिकांचा जीव वाचवणे ही सरकारचीही जबाबदारी आहे, असेही याचिकेत म्हटले आहे.



### न्यायालयाने मागितले उत्तर

दरम्यान, दाखल याचिकेवर न्यायालयाने केंद्र आणि दिल्ली सरकारकडून उत्तर मागितलं असून न्यायालयाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत उद्या याप्रकरणाची सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता या सुनावणीकडे देशाचे लक्ष लागले असून सरकार उपोषणकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची दखल घेणार का, त्यांच्याशी चर्चा करणार का हे पाहावे लागेल.



## संपादकीय

# ‘पैशाशी नाते की जीवनाशी?’

आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान जगात तरुणांच्या यशाचे मोजमाप अनेकदा त्यांच्या पगारावर, जीवनशैलीवर आणि आर्थिक स्थितीवर केले जाते. परिणामी, "मी किती कमावतो?" हा प्रश्न "मी कोण आहे?" या अधिक मूलभूत प्रश्नावर मात करताना दिसतो. मात्र, आर्थिक यश आणि वैयक्तिक समाधान यांचा परस्पर संबंध नेहमीच सरळ नसतो. त्यामुळे प्रत्येक युवकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. "पैशाशी माझे नाते नेमके काय आहे?"

अठरा ते एकोणतीस वर्षे हा आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळात व्यक्ती स्वतःची ओळख घडवत असते, करिअरची दिशा निवडत असते आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करत असते. या प्रवासात पैसा महत्त्वाचा असला, तरी तोच जीवनाचा अंतिम उद्देश बनला, तर अनेक मानसिक आणि सामाजिक समस्या निर्माण होऊ शकतात.

आज सामाजिक माध्यमे, समवयस्कांशी होणारी सततची तुलना, कुटुंबीयांच्या अपेक्षा आणि समाजाने निर्माण केलेल्या यशाच्या संकल्पना यामुळे अनेक युवक अवास्तव पगाराच्या अपेक्षा बाळगतात. प्रत्यक्ष रोजगार बाजारातील वास्तव आणि या अपेक्षा यामधील मोठी दरी मानसिक तणाव, असमाधान आणि काही वेळा स्वेच्छेच्या बेरोजगारीलाही कारणीभूत ठरते.

अनेक तरुणांना वाटते की मोठा पगार मिळाल्याशिवाय त्यांचे करिअर यशस्वी ठरणार नाही. त्यामुळे आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे दुर्लक्ष करून केवळ अधिक उत्पन्नाच्या मागे धावण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. या प्रक्रियेत व्यक्तीची सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि अंतर्गत समाधान यांना दुय्यम स्थान मिळते.

प्रसिद्ध संशोधकांच्या मते, कोणत्याही समाजाची खरी ताकद ही त्याच्या आदर्शवादी



आणि स्वप्न पाहणाऱ्या तरुणांना योग्य दिशा देण्यात असते. परंतु जेव्हा यशाची व्याख्या केवळ आर्थिक प्रगतीपुरती मर्यादित राहते, तेव्हा तरुण स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याऐवजी स्वतःला "विक्रीयोग्य" बनविण्यावर अधिक भर देतात. उत्तम जीवनमूल्ये, सामाजिक योगदान आणि वैयक्तिक समाधान या गोष्टी मागे पडतात.

युवकांसोबत कार्य करणाऱ्या विविध संस्थांच्या अनुभवातूनही हे स्पष्ट झाले आहे की पैशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला, तर मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. आर्थिक अपेक्षा वास्तवाशी जोडल्या गेल्या आणि त्या व्यक्तीच्या मूल्यांशी व जीवनातील उद्दिष्टांशी सुसंगत झाल्या, तर आर्थिक चिंता लक्षणीयरीत्या कमी होते. यामुळे युवक अधिक आत्मविश्वासाने करिअरची निवड करू शकतात आणि समाजोपयोगी क्षेत्रांमध्येही काम करण्याची प्रेरणा मिळते.

पैसा हा जीवनातील आवश्यक घटक आहे; परंतु तो जीवनाचे अंतिम मूल्य ठरू शकत नाही. आर्थिक सुरक्षितता महत्त्वाची असली, तरी तिच्यासोबत मानसिक समाधान, सामाजिक जबाबदारी, वैयक्तिक विकास आणि अर्थपूर्ण आयुष्य यांनाही तितकेच महत्त्व आहे.

आजच्या युवकांनी आपल्या यशाचे मोजमाप केवळ पगाराच्या आकड्याने न करता, त्यांनी स्वीकारलेल्या जबाबदाऱ्यांनी, समाजासाठी केलेल्या योगदानाने, स्वतःच्या समाधानाने आणि जीवनातील ध्येयपूर्तीने करणे अधिक आवश्यक आहे. शेवटी, प्रत्येक युवकाने स्वतःला हा प्रश्न विचारायलाच हवा. "मी पैशासाठी जगतो आहे, की पैसा माझ्या अर्थपूर्ण जीवनासाठी आहे?" या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तरच भविष्यातील यश, समाधान आणि मानसिक आरोग्याची खरी दिशा ठरवू शकते.

## संस्कृत सुभाषित

आरोग्यंभास्करदिच्छेद्धनमिच्छेद्धुताशनात्
ज्ञानं महेश्वरादिच्छेन्मुक्तिच्छेज्जनार्दनात्।।

अर्थ : सूर्याकडून आरोग्य मागावे, अग्नीकडून संपत्ती मागावी, शंकराकडून ज्ञान आणि विष्णूकडून मोक्षाची अपेक्षा करावी.

## गुरु वचन

### जीवनाचे सार – चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, नातेवाईक–त्रयस्त, शोषण–पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक–संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्ये पेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन–धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १०१२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 2 | 9 | | | 7 | |
| | 7 | 6 | | | | | 1 | 9 |
| | | 9 | 4 | | | | 3 | 2 |
| 9 | | | | 8 | 2 | | | 7 |
| | | 5 | | 4 | | 3 | | |
| 6 | | | 7 | 5 | | | | 1 |
| 5 | 9 | | | | 8 | 7 | | |
| 8 | 6 | | | | | 2 | 5 | |
| | 2 | | | 6 | 7 | | | 8 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०११ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 7 | 6 | 1 | 4 | 5 | 9 | 3 | 8 |
| 4 | 3 | 9 | 6 | 8 | 2 | 5 | 7 | 1 |
| 1 | 5 | 8 | 9 | 7 | 3 | 6 | 2 | 4 |
| 3 | 9 | 5 | 8 | 1 | 4 | 2 | 6 | 7 |
| 8 | 2 | 7 | 5 | 9 | 6 | 1 | 4 | 3 |
| 6 | 4 | 1 | 3 | 2 | 7 | 8 | 9 | 5 |
| 9 | 1 | 3 | 7 | 6 | 8 | 4 | 5 | 2 |
| 7 | 8 | 2 | 4 | 5 | 9 | 3 | 1 | 6 |
| 5 | 6 | 4 | 2 | 3 | 1 | 7 | 8 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९७९ – इराकचे राष्ट्रपती हसन अल बक्र यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सद्दाम हुसैन यांना त्यांचा जागी राष्ट्रपती बनविण्यात आले.
- १९९० – फिलीपीनमध्ये भूकंपाचा धक्का, १६०० ठार.
- २००६ – चीनच्या शांक्सी प्रांतातील एका कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात १८ कामगारांचा मृत्यू झाला.

### राष्ट्रीय

- १८५७ – १८५७ च्या युद्धातील कार्यकुशल सेनापती नानासाहेब पेशवे यांचा पराभव होऊन पेशवाईचा शेवट झाला.
- २००४ – तामीळनाडूच्या कुंबाकुनम शहरात खासगी शाळेत लागलेल्या आगीत ९० मुले ठार.


### जन्म

- १८४४ – तुकारामांच्या अभंगांचा इंग्रजीत अनुवाद करणारे प्राध्यापक काशिनाथ मराठ.
- १९१४ – जुन्या काळातील प्रसिद्ध कथाकार वामन कृष्ण चोरघडे यांचा नरखेड जि. नागपूर येथे जन्म.
- १९१९ – दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती चोई क्युहा यांचा जन्म.
- १९७३ – दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेटपटू शॉन पोलॉकचा जन्म.
- १९८४ – बॉलीवुड अभिनेत्री कटरीना कैफचा जन्म.

### निधन

- १३४२ – हंग्रीचा राजा चार्ल्स पहिला याचे निधन.
- १५५७ – इंग्लंडचा हेन्री आठवा याच्या चौथी पत्नी अनेऑफ क्लीव्सचे निधन.
- १९५३ – इंग्लीश लेखक हीलेर बेलॉकचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १०१२



**आडवे शब्द**

१. झी मराठीवरील आणखी एक नायिकाप्रधान मालिका!
४. कडा दुमडलेली करंजी
७. मजेत रेंगाळत
१२. इच्छित प्राप्तीची आज्ञा
१३. मल्ल
१५. हिंदीत पण–परंतु
१६. कागदी चलन
१७. हिंदी चित्रपटगीतात भेटणारा परमेश्वर
१८. अंगावरील बारीक केस
१९. पत्त्यातील जोडपे
२१. असक्ती
२२. लोकनाट्य
२४. नामघोष
२८. विशेष
२९. मृत्तिकाकण
३१. जेमतेम
३३. शिकार
३६. कोळ्यांचा व्यवसाय
३८. शिव शिव
४०. काया व अंत:करण
४३. साडेतीन मुहूर्तांपैकी एक
४५. नवऱ्याची एखादी सवय वा वस्तूही बायकांना हिच्याप्रमाणे वाटू शकते!
४६. वडिलांचे इंग्रजी संबोधन
४७. भूगोलातील एक ’वृत्त’
४८. टॉनिकला आयुर्वेदातील शब्द
४९. शिखराचे टोक
५०. नित्य, सलग
५१. प्रामाणिक
५२. अभिप्राय
५४. निकट, जवळ
५६. पत्र
५८. धाड घालून पिक फस्त करणारा किडा
५९. विनासायास, विनाकारण
६२. छोटे कुबड
६३. पाऊस (हिंदी)
६५. न वापरलेली
६६. इंद्रिय
६७. कंजूष
६९. मागणारा
७०. खून करणे, वध करणे
७३. बिनवासाचे पांढरे फूल
७५. रशिया (हिंदी)
७७. माणूस
७९. स्वप्नरंजनातील पहिला शब्द
८०. सैन्याचा मालपुरवठा
८४. यातनामय जिणे
८५. चार वेदांपैकी एक
८६. यथेच्छ

**उभे शब्द**

१. पौगंडावस्था
२. धांदल, गडबड
३. एक ज्वालाग्रही सुगंधी पदार्थ
४. पानात उजवीकडे वाढले जाणारे पदार्थ, उदा.भाजी, इ.
५. नूतन
६. सिंह
७. रम्य
८. नंतर
९. होडी
१०. शिवसेनेतील ’पंत’
११. किल्ल्याभोवतीची भिंत
१४. शेवटचा सूर लांबवून बोलणे
२०. सुकुमार
२१. संधी
२३. जनावरांची कत्तल करणारा
२५. सोन्याचा धागा
२६. नवरा
२६अ. चांगला (अनेकदा उपरोधाने वापरला जाणारा शब्द)
२७. वस्ती
२८. कंड, खुमखुमी
३०. कुटुंब, गोतावळा
३१. छिद्रातून सांडणारे ऊन
३२. धैर्य, धाडस
३४. आशीर्वाद
३५. गप्प बसण्याचे व्रत
३७. मोहक, नशा आणणारे
३९. बारीक झणझण
४०. शोध, माग
४१. चेन्नईचे ब्रिटिशकालीन नाव
४३. परीक्षा घेणे, तपासणे
४४. व्यार्थ जाणारे, निरर्थक
४६. हालचालीवर ठेवलेली नजर
४७. स्वार्थ, हिंदीत अर्थ
४९. सरोज, पंकज
५१. वर्ष
५३. आक्षेप नाही या अर्थी प्रमाणपत्र
५७. पाण्याची जागा, जलाशय
५८. अणकुचीदार
५९. कारण
६०. ज्याप्रमाणे
६१. अनामत, गुंतविलेली रक्कम
६४. सिद्ध
६५. शेळीचे पिल्लू
६६. असाधारण
६८. सापाची एक जात
७१. धोबी
७२. संगीतातील एक राग
७४. उष्ण
७६. एक तारवाद्य
७८. अरण्य
८१. लंकर्णच पण गाढव नाही!
८२. धमकी
८३. पथक, समूह, गट

**जम्बो शब्दकोडे क्र. १०११ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ. गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

उभे उत्तर : १.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हातारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३. मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

## उपदेशकथा

### वक्तशीरपणा

‘तिसरी कसम’ या चित्रपटाचे चित्रीकरण बिहारमधील पूर्णिया जवळच्या जंगलात सुरू होते. दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांना अगदी पहाटेचे एक दृश्य चित्रित करायचे होते म्हणून त्यांनी नायक राजकपूर यांच्या स्वीय सहायकाला दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला हजर राहण्यास सांगितले. त्याने राजकपूरना हा निरोप देण्यास साफ इन्कार केला. ‘त्यांचा दिवस सकाळी अकरा वाजता सुरू होतो हे मला ठाऊक असताना माझी हिंमतच होणार नाही त्यांना पहाटे या म्हणून सांगायला.’ मग दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांनीच ते काम स्वीकारले. ते राजकपूरला म्हणाले, ‘उद्या मला दोन मोठ्या लोकांना बरोबर घेऊन काम करायचे आहे. वेळ पहाटे साडेपाचची आहे. मात्र, ती चुकली तर त्यातला एक मोठा माणूस निघून जाईल... एक मोठा माणूस म्हणजे साक्षात् सूर्यनारायण व दुसरे आपण स्वत: आहात.’ दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला सर्वांच्या आधी राजकपूर स्वत: पोहोचलेले होते. एवढेच नाही तर संपूर्ण युनिटसाठी त्यांनी चहादेखील तयार ठेवलेला होता. सर्वांना शरमल्यासारखं झालं. राजकपूर कामात आपलं भान हरपून जातात हे साऱ्यांना पुन्हा एकदा कळलं.

कथा उपदेश : मोठी माणसं आपल्या कामाला नेहमी सर्वोच्च अग्रक्रम देतात.

## : SMS :

Auto driver on the road:kakinada... kakinada.... vengalappa:babu kakinada.. Driver:avunandi Vengalappa:babu tinnaga velli left tisuko vachstundi.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.४ | २३.८ |
| अहमदनगर | ३२ | २२.५ |
| अकोला | ३६.६ | २६.२ |
| अमरावती | ३६.७ | २६.१ |
| बीड | ३८.८ | ३०.७ |
| भंडारा | ३८.७ | ३०.४ |
| बुलढाणा | ४४.५ | ३१.८ |
| चंद्रपूर | ३८.९ | ३१.२ |
| चेन्नई | ४३.९ | ३१.२ |
| नवी दिल्ली | ४४.२ | ३३.६ |
| धुळे | ३६.७ | २६ |
| गोंदिया | ३८.६ | ३०.१ |
| जळगाव | ३६.८ | २५.९ |
| कोल्हापूर | ३१.६ | २३ |
| लातूर | ३५.१ | २३.२ |
| मुंबई | ३६.३ | ३२.८ |
| नागपूर | ३७.२ | २९.४ |
| नांदेड | ३६.५ | २५.८ |
| नंदूरबार | ३४.३ | २५.४ |
| नाशिक | ३१.९ | २३.९ |
| पुणे | ३०.९ | २२.२ |
| पंढरपूर | ३७.६ | २३.८ |
| सातारा | ३२.९ | २२.७ |
| सांगली | ३३.७ | २२.९ |
| सोलापूर | ३७.५ | २४.२ |
| वर्धा | ३७.८ | २७.३ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर यश मिळाल्याने उत्साह वाढेल. श्रेष्ठ लोकांच्या भेटी होतील.

**तुळ :** तुळ : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर तणावमुक्त झाल्यामुळे प्रसन्न वातावरण राहील. कार्याचा विस्तार वाढेल.

**वृषभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. प्रयत्न केल्यानंतर अडचणी दूर होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पूर्व व्यक्तिगत कामात प्रगती होईल. संत लोकांचा सहवास मिळेल. आपल्या चांगल्या संबंधामुळे फायदा होईल.

**मिथुन :** मिथुन : शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: उत्तर व्यापाराच्या विस्तारासाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**धनु :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.

**कर्क :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम नवीन संबंध प्रस्थापित होतील. आपला प्रभाव वाढल्याने विरोधक त्रस्त होतील.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. आपली महत्वकांक्षा पूर्ण होईल. विरोधकांपासून सावधानी बाळगा.

**सिंह :** शुभ रंग: गुलाबी,शुभ दिशा: दक्षिण विरोधकांच्या हालचाली वाढतील. आर्थिक तणावामुळे कुटुंबात वाद होण्याची शक्यता.

**कुंभ :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण कौटुंबिक वातावरण उत्साहपूर्वक राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक योग चांगले आहेत.

**कन्या :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण मितभाषी राहिल्यामुळे आपणास अडचणींचा सामना करावा लागेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण अगोदर केलेल्या कामाचा चांगला परिणाम दिसण्यास सुरूवात होईल. अडचणींवर मात कराल. अधिकाऱ्यांची मदत मिळेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:ओषा १९:५१:५९ |
| १६ जुलै २०२६ | योग:सिद्ध २५:२१:४२+ |
| गुरुवार | करण:कौलव ०८:५३:१३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल १९:३६:०१ |
| आषाढ शके | सूर्य:कर्क २३:३५:११ |
| संवत्– १९४८ | चन्द्र:सिंह१९:५१:५९ |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४८ |
| अयन– दक्षिणयन | मुस्लिम मास – सफर |
| मास– आषाढ | तारीख – १ |
| ऋतु– सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | रथयात्रा |
| तिथि:द्वितीया ०८:५३:१३ | मुस्लिम सफर मासारंभ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.




## पुस्तकी शिक्षण किंवा पाठांतरापेक्षा कौशल्य विकास आवश्यक

■ महापौर मंजुषा नागपुरे ; क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजी व निरंजन सेवाभावी संस्थेतर्फे महाराष्ट्रातील ३ हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्त्व

पुणे (दै. संध्या)

काहीही झाले, कोणतीही परिस्थिती आली तरी देखील आपण शिक्षण थांबविता कामा नये. चांगले शिक्षण घेण्याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. केवळ पुस्तकी शिक्षण किंवा पाठांतर महत्वाचे नाही, तर विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कलागुण विकसित करून कौशल्य विकास करणे आवश्यक आहे, मूलभूत शिक्षणासोबतच कौशल्य विकास गरजेचा आहे, असे मत महापौर मंजुषा नागपुरे यांनी व्यक्त केले.

क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून आणि पुण्यातील निरंजन सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ३ हजार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेण्यात आले आहे. त्याअंतर्गत पुण्यातील २ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट प्रदान कार्यक्रम गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडला. यावेळी सीजीएसटी आयुक्त संजय कुमार, क्लिन सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कार्यकारी संचालक कृष्णकुमार बूब, नीलिमा बूब, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, अभिनेते विजय पटवर्धन, भगवंतराव मोरे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. नवनीत मानधनी, सचिव सीए दुर्गेश चांडक, कार्याध्यक्ष भारत वेदपाठक व्यासपीठावर उपस्थित होते.

कृष्णकुमार बूब म्हणाले, ज्यांना सहाय्य मिळू शकत नाही, अशा गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, हा आमचा हेतू आहे. क्लीन सायन्सच्या माध्यमातून शिक्षण, पाणी, वृक्ष संवर्धन आणि महिला सबलीकरण या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य केले जाते. कौशल्य विकासाद्वारे महाराष्ट्रातील तरुणांना आत्मनिर्भर करण्याचाही आमचा प्रयत्न आहे. निरंजन सेवाभावी संस्थेचे गरजू विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शैक्षणिक पालकत्व योजनेचे कार्य अत्यंत स्तुत्य असून आम्ही यापुढेही त्यांच्यासोबत काम करू. संजय कुमार म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीमधून बाहेर येण्यास शिक्षण हेच एकमेव माध्यम आहे. त्यातून आपल्या प्रत्येकाचा उत्तम विकास होतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संजीव सोशल फाउंडेशनचा 'वारकरी सेवा' अभियान

पुणे (दैनिक संध्या) : संजीव सोशल फाउंडेशनतर्फे संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त सलग दुसऱ्या वर्षी 'वारकरी सेवा अभियान आयोजित करण्यात आले होते. उपक्रमात हजारो वारकरी बांधवांनी विविध नि:शुल्क सेवांचा लाभ घेतला. अभियानांतर्गत बूट व चप्पल दुरुस्ती, बॅग दुरुस्ती, पायांची मालिश, महिला आराम कक्ष तसेच फराळ व दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. स्वयंसेवकांनी सेवाभावाने वारकऱ्यांची सेवा केली. या सेवायज्ञास जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या दहाव्या पिढीतील वंशज ह.भ.प. मुकुंद महाराज मोरे, ह.भ.प. नितीन महाराज मोरे तसेच ह.भ.प. सुप्रिया ताई साठे यांची उपस्थिती लाभली. यावेळी पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे, अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर विश्वनाथ मोरे तसेच विश्वस्त ह.भ.प. गणेश उत्तम मोरे, ह.भ.प. वैभव अशोक मोरे आणि ह.भ.प. दिलीप नारायण मोरे उपस्थित होते. छाया संजीव गदादे म्हणाल्या, वारकरी बांधवांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि त्यांच्या मुखातून मिळणारे आशीर्वाद हीच आमच्या सेवाकार्यातील खरी कमाई आहे. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवक आणि सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा सेवायज्ञ यशस्वी झाला. भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात आणि अधिक सेवाभावाने हे अभियान सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. या अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी संजीव सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीमुळे या उपक्रमाचे वारकरी बांधव व मान्यवरांनी कौतुक केले.

### फोनपे ने आपल्या प्लॅटफॉर्मवर लाँच केले 'ऑल-इन-वन टॅक्स फाइलिंग सोल्यूशन'

पुणे (दैनिक संध्या) : फोनपे ने आज आपल्या प्लॅटफॉर्मवर एका सर्वसमावेशक 'टॅक्स फाइलिंग' फीचरच्या लाँचची घोषणा केली आहे. वैयक्तिक करदाते, फ्रीलान्सर्स आणि लहान व्यावसायिक या सर्वांसाठी टॅक्स कंप्लायन्स सोपे करण्यासाठी हे फीचर तयार करण्यात आले आहे. याद्वारे कोट्यवधी फोनपे युजर्स त्यांचे इन्कम टॅक्स रिटर्न (ITR) सहज फाईल करू शकतील आणि ॲपच्या विश्वासार्ह इकोसिस्टममधून थेट मासिक GST कंप्लायन्सचे व्यवस्थापन करू शकतील. भारताचे अग्रगण्य डिजिटल टॅक्स कंप्लायन्स प्लॅटफॉर्म टॅक्सबडी सोबतच्या भागीदारीत लाँच केलेले हे फीचर सेवांचा एक एकात्मिक संच प्रदान करते. यामध्ये ₹24 पासून सुरू होणारे स्वतंत्र सेल्फ-फाइलिंग, क्लिष्ट टॅक्स परिस्थितींसाठी तज्ज्ञांची मदत मिळणारे प्लॅन्स आणि लहान व्यापाऱ्यांसाठी मासिक GST फाइलिंगचा समावेश आहे. हे इन-ॲप फीचर इतर कोणत्याही बाह्य पोर्टल्सना भेट देण्याची गरज पूर्णपणे संपवते. याद्वारे ITR ऑप्टिमायझेशनसाठी समर्पित तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अखंडितपणे चालणारे GST फाइलिंग यांसारखी एंड-टू-एंड कंप्लायन्स टूल्स मिळतात, जी ॲपवरील दैनंदिन आर्थिक सेवांसोबतच अत्यंत सोयीस्करपणे उपलब्ध आहेत. या लाँचवर भाष्य करताना, फोनपे च्या इन-ॲप कॅटेगरीच्या हेड, निहारिका सैगल म्हणाल्या, "फोनपे वर आम्ही आमच्या युजर्सच्या मुख्य उपयुक्तता गरजा पूर्ण करणारी एक सुलभ आणि विना-अडथळा आर्थिक इकोसिस्टम तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत. तज्ज्ञांचा टॅक्स सल्ला आणि परवडणारे फाइलिंग सोल्यूशन्स सर्वांसाठी सहज उपलब्ध करून देऊन, नोकरदार प्रोफेशनल्सपासून ते गल्लीबोळातील व्यापाऱ्यांपर्यंतच्या आमच्या सर्व युझर्सना त्यांचे टॅक्स फाइलिंग सहजतेने आणि आत्मविश्वासाने व्यवस्थापित करण्यासाठी सक्षम करणे हे आमचे ध्येय आहे."

# भारतीय ज्ञानसंपदा मौखिक आणि लिखित या दोन्ही स्वरूपांत समृद्ध

## प्रसाद प्रकाशन आणि विज्ञान भारती यांच्या वतीने 'प्राचीन शास्त्रे किती खरी' यावर वादसभेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)



डॉ. उमा बोडस म्हणाल्या, एखादा विषय समजून घ्यायचा असेल, तर त्याच्या सर्व बाजू समजून घेणे आवश्यक असते. केवळ एखाद्या गोष्टीची माहिती असणे म्हणजे ज्ञान नव्हे. आपल्या भारतीय परंपरेत वाद म्हणजे भांडण नसून प्रश्न मांडणे, तर्क मांडणे आणि शंका उपस्थित करणे होय. अशा चिकित्सक संवादातून सत्य अधिक स्पष्ट होत जाते. त्यामुळे वादसभा ही मतभेद मिटविण्याचे आणि सत्याचा शोध घेण्याचे प्रभावी माध्यम आहे.

भारतीय ज्ञानसंपदा ही मौखिक आणि लिखित अशा दोन्ही स्वरूपांत समृद्ध आहे. धातुशास्त्र, पर्जन्यशास्त्र, सेंद्रिय शेती, जलव्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र यांसारख्या विविध ज्ञानशाखा आपल्या पूर्वजांनी विकसित केल्या आणि त्या पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवल्या. मात्र, कालांतराने या समृद्ध ज्ञानपरंपरेचा विसर आपल्याला पडत आहे . नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञानसंपदेला विशेष स्थान देण्यात आले असून त्यासाठी स्वतंत्र घटक समाविष्ट करण्यात आला आहे. भारतीय ज्ञानसंपदा म्हटली की त्यामध्ये लिखित स्वरूपातील ग्रंथसंपदेसह मौखिक परंपरेतून जतन झालेले ज्ञानही समाविष्ट होते. अनेक पारंपरिक ज्ञानप्रवाह पिढ्यान्पिढ्या मौखिक माध्यमातून पुढे आले आहेत. आपल्या इतिहासातील अनेक घटना आणि पराक्रम पोवाड्यांच्या माध्यमातून जतन झाले असून, हीदेखील भारतीय ज्ञानपरंपरेचीच मौखिक अभिव्यक्ती आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.नितीन करमाळकर यांनी व्यक्त केले.

प्रसाद प्रकाशन आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्राचीन शास्त्रे किती खरी' या विषयावर एस. एम. जोशी सभागृहात वादसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रसाद प्रकाशनच्या संचालिका डॉ. उमा बोडस उपस्थित होत्या. वादसभेच्या न्यायाध्यक्षपदी डॉ. नितीन करमळकर होते तर वादसभेत डॉ. माधवी गोडबोले, डॉ. मनीषा पुराणिक, डॉ. मनीष वाळवेकर, डॉ. अंबरीष खरे, श्री. रमेश दाते आणि डॉ. दीप्ती सिधये सहभागी झाले होते.

भारतीय शास्त्रपरंपरा ही केवळ वैराग्य किंवा मोक्ष यापुरती मर्यादित नसून, ऐहिक आणि पारलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनमूल्यांचा विचार करणारी आहे. आपल्याकडे रसशास्त्र, धातुशास्त्र यांसारख्या अनेक ज्ञानशाखांचे पुरावे उपलब्ध आहेत. आजही त्यांचे भौतिक अवशेष आणि ऐतिहासिक साक्षी पाहायला मिळतात. त्यामुळे प्राचीन भारतात या विषयांबाबत प्रगल्भ वैचारिक मांडणी आणि ज्ञानपरंपरा अस्तित्वात होती, याबद्दल शंका नाही. त्या काळातील विद्वानांनी अनेक संकल्पना मांडल्या आणि भविष्यात काय घडू शकते, याचाही विचार केला होता.

मात्र, आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने केवळ वैचारिक मांडणी पुरेशी ठरत नाही. विज्ञान म्हणजे रथाची दोन चाके असल्याप्रमाणे तर्काधिष्ठित गृहीतक आणि त्याची प्रयोगांद्वारे पडताळणी हे दोन्ही घटक आवश्यक असतात. भारतीय प्राचीन शास्त्रांमध्ये अनेक ठिकाणी वैचारिक मांडणी आढळते; परंतु त्या संकल्पनांची प्रयोगाधारित पडताळणी झाल्याचे पुरावे सर्वत्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या सर्व गोष्टींचा आधुनिक विज्ञानात जसाच्या तशा समावेश करता येत नाही.

हजारो वर्षांपूर्वीची स्थापत्यकला, धातुकाम, जलव्यवस्थापन आणि इतर तांत्रिक उपलब्धी आजही भौतिक स्वरूपात दिसून येतात. यावरून त्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे ज्ञान निश्चितच अस्तित्वात होते. काही ग्रंथ आज उपलब्ध नसल्याने किंवा सर्व नोंदी सापडत नसल्याने त्या काळातील लोकांना हे ज्ञान नव्हते, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. हजारो वर्षांची परंपरा पाहता, या ज्ञानाची नोंद विविध स्वरूपात झालेली असण्याची शक्यता आहे.

आपण असे म्हणू शकत नाही की प्राचीन भारतात विज्ञानातील सर्वच ज्ञान उपलब्ध होते; तसेच काहीच नव्हते, असे म्हणणेही तितकेच चुकीचे आहे.

काही क्षेत्रांत आपण निश्चितच अत्यंत प्रगत होतो आणि त्याचे पुरावे उपलब्ध आहेत. त्या उपलब्धींचा स्वीकार करतानाच, विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात आपण पूर्णतः प्रगल्भ होतो, असा दावा करणेही योग्य ठरणार नाही. अशा संतुलित आणि पुराव्यांवर आधारित दृष्टिकोनातून भारतीय ज्ञानपरंपरेकडे पाहण्याची गरज आहे. या बाबी वादसभेत मांडण्यात आल्या.

## एथर आपला पहिला मास-मार्केट ईएल प्लॅटफॉर्म स्कूटर सादर करणार

पुणे (दै. संध्या)

भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहन निर्माता एथर एनर्जी लिमिटेड यांनी आज जाहीर केले की त्यांच्या प्रमुख समुदाय कार्यक्रमाचा चौथा आवृत्ती एथर कम्युनिटी डे 29 ऑगस्ट 2026 रोजी बेंगळुरूमध्ये आयोजित केला जाणार आहे. या वर्षीच्या कार्यक्रमाची थीम आहे "अ न्यू डॉन ऑफ मॅजिक", ज्यामध्ये एथर आपल्या नवीन ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित पहिला स्कूटर सादर करणार आहे. यामुळे एथर मोठ्या बाजारपेठेतील स्कूटर सेगमेंटमध्ये प्रवेश करणार आहे. नवीन स्कूटरसोबतच एथर तंत्रज्ञान, चार्जिंग आणि संपूर्ण इकोसिस्टममध्ये अनेक नवकल्पना सादर करणार आहे, ज्यामुळे मालकीचा अनुभव अधिक सहज आणि कनेक्टेड होईल. ईएल प्लॅटफॉर्म हा एथरचा पुढील पिढीचा वाहन आर्किटेक्चर असून कंपनीचा 450 नंतरचा पहिला पूर्णपणे नवीन वाहन प्लॅटफॉर्म आहे. अधिक बहुपयोगी, स्केलेबल आणि उत्पादन कार्यक्षमतेसाठी शून्यातून डिझाइन केलेला हा प्लॅटफॉर्म एथरच्या भविष्यातील उत्पादन पोर्टफोलिओला विविध सेगमेंटमध्ये आधार देणार आहे. या प्लॅटफॉर्मवर तयार झालेला पहिला स्कूटर एथरसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. यामुळे कंपनीला ₹1 लाख ते ₹1.25 लाख किंमत श्रेणीतील मोठ्या बाजारपेठेत प्रवेश मिळेल, एकूण ग्राहकवर्ग वाढेल आणि पुढील वाढीचे अध्याय उघडले जातील. एथर कम्युनिटी डे 2026 मध्ये हजारो एथर मालक, ऑटोमोटिव्ह आणि टेक्नॉलॉजी उत्साही तसेच भागीदार एकत्र येऊन एथरने तयार केलेल्या उत्पादनांचे टेक्नॉलॉजीचे आणि अनुभवांचे पहिले दर्शन घेतील. गेल्या तीन वर्षांत एथर कम्युनिटी डे भारतातील सर्वाधिक अपेक्षित ऑटोमोटिव्ह आणि टेक्नॉलॉजी कार्यक्रमांपैकी एक बनला आहे.

## डॉ. बत्राज यांनी भारतातील पहिली प्रगत हेअर रिग्रोथ ट्रीटमेंट 'हेअरगेन' सादर

पुणे (दै. संध्या)



या उत्पादनाच्या आरंभाविषयी टिप्पणी करताना डॉ. बत्राज हेल्थकेअरचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक तसेच ट्रायकोलॉजिकल सोसायटी ऑफ लंडन (यूके) चे पहिले भारतीय अध्यक्ष डॉ. अक्षय बत्रा म्हणाले: "केसांचे पुनरुज्जीवन एका पूर्णपणे नवीन युगात प्रवेश करत आहे. आजचे ग्राहक विज्ञानावर आधारित असलेल्या, कमीत कमी त्रासदायक असलेल्या आणि शरीराच्या स्वतःच्या पुनरुत्पादक यंत्रणेसोबत काम करून केसांची लक्षणीय वाढ घडवून आणण्यास सक्षम असलेल्या उपायांच्या शोधात आहेत. एक्सोसोम थेरपी ही पुनरुत्पादक औषधशास्त्रातील सर्वात उत्साहदायक प्रगतींपैकी एक आहे, कारण त्यातून केसांच्या सुप्त मुळांना जागृत होण्याचे जोरदार जैविक संकेत मिळतात आणि केसांच्या नैसर्गिक वाढीस मदत होते."

डॉ. बत्राज हेल्थकेअरने ५० अब्ज एक्सोसोम्सच्या शक्तीवर चालणाऱ्या, भारतातील पहिल्या प्रगत केस पुनर्वाढीच्या उपचाराची, 'हेअरगेन'ची आज घोषणा करून रिजनरेटिव्ह मेडिसिनच्या (पुनरुत्पादक औषधशास्त्र) क्षेत्रात एक नवीन टप्पा गाठला. त्यामुळे केस पुनरुज्जीवनासाठी शस्त्रक्रियाविरहित उपाय शोधणाऱ्या रुग्णांसाठी जगातील सर्वात आश्वासक रिजनरेटिव्ह तंत्रज्ञानांपैकी एक उपलब्ध होत आहे. केस गळणे ही आता केवळ सौंदर्याची समस्या राहिलेली नाही. भारतातील सर्व वयोगटांतील १५ कोटी लोकांसाठी ही एक भावनिक आणि आत्मविश्वास खच्ची करणारी समस्या बनली आहे.'हेअरगेन' हे केस गळण्याच्या विविध टप्प्यांचा आणि कारणांचा अनुभव येणाऱ्या पुरुष आणि महिलांसाठी विकसित करण्यात आले आहे. यामध्ये आनुवंशिक केसगळती (पुरुष आणि महिलांमधील टक्कल पडणे), प्रसूतीनंतरची केसगळती, रजोनिवृत्तीनंतर केस पातळ होणे, तणावामुळे होणारी केसगळती आणि केस पातळ होण्याच्या सुरुवातीच्या टप्प्याचा समावेश आहे. 'हेअरगेन' टाळूला थेट शक्तिशाली पुनरुत्पादक संकेत देऊन, सुप्त केसांच्या मुळांना उत्तेजित करते, टाळूचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील नैसर्गिक केस वाढण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन देते. त्यामुळे कालांतराने केस अधिक जाड, दाट आणि निरोगी दिसण्यास मदत होते. हा उपचार डॉ. बत्रा यांच्या स्वमालकीच्या ट्रायक्सो कॉम्प्लेक्सवर आधारित आहे. ही एक बहुस्तरीय पुनरुत्पादक पद्धत असून, यामध्ये एक्सोसोम्सच्या शक्तीसोबत पीडीआरएन (पॉलिडिऑक्सीरिबो न्यूक्लियोटाइड), कोलेजन, कॅफीन, ग्रोथ फॅक्टर्स, पॉलिपेप्टाइड्स आणि कॉपर ट्रायपेप्टाइड्स यांसारखे शास्त्रीय आधारावर निवडलेले घटक एकत्र केले आहेत. हे सर्व घटक एकत्रितपणे कार्य करून खराब झालेल्या केसांच्या मुळांचे पुनरुज्जीवन करतात, टाळूतील सूक्ष्म रक्ताभिसरण सुधारतात, टाळूचा संरक्षक थर मजबूत करतात, केसांच्या वाढीचा सक्रिय टप्पा वाढवतात आणि केसांची घनता व गुणवत्ता वाढवतात. यामुळे केसांच्या मुळांपासून निरोगी वाढीस मदत होते आणि त्याचबरोबर सध्याच्या केसांची ताकद व लवचिकता सुधारते.

एखाद्या व्यक्तीची स्थिती आणि उपचार पद्धतीनुसार, 'हेअरगेन'मुळे अंदाजे ७५ दिवसांत दिसून येतील अशा सुधारणा अपेक्षित आहेत. तज्ज्ञांच्या क्लिनिकल मार्गदर्शनाखाली निरोगी टाळू, केसगळतीत घट, केसांची मजबूत मुळे, केसांची जाडी आणि घनतेत सुधारणा, तसेच केसांची लक्षणीय वाढीची रुग्ण अपेक्षा करू शकतात. यामुळे हा डॉ. बत्राजच्या उपलब्ध असलेल्या सर्वांत जलद शस्त्रक्रियाविरहित केस पुनरुज्जीवन उपायांपैकी एक ठरतो.

## सीमेन्सने पुण्यात एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअरची केली घोषणा

पुणे (दै. संध्या)




बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी आणि प्रीमियम होम अप्लायन्सेसमधील जागतिक अग्रणी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रा. लि. ने आज शेरिल एंटरप्रायझेस प्रा.लि. च्या भागीदारीत पुण्यात आपल्या एक्सक्लुझिव्ह सीमेन्स ब्रँड स्टोअर ची घोषणा केली आहे. सोलिटेअर बिझनेस हब-१, बाणेर येथे स्थित, हे नवीन ब्रँड स्टोअर सिमेन्सची 'इंटेलिजेंट लिव्हिंग'ची संकल्पना पुण्यात आणते. हे एक असे आकर्षक ठिकाण आहे, जिथे अर्थपूर्ण नावीन्य, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक डिझाइन एकत्र येऊन आधुनिक स्वयंपाकघराला एक नवीन ओळख देतात. केवळ एक विक्री केंद्र न राहता, हे स्टोअर घरमालक, वास्तुविशारद आणि डिझाइनर्सना हे अनुभवण्याची संधी देते की, इंटेलिजेंट उपकरणे एकात्मिक परिसंस्थेप्रमाणे एकत्र कशी काम करतात; ती गरजांचा अंदाज घेतात, दैनंदिन कामे सोपी करतात आणि दैनंदिन जीवनाला उन्नत करणारे समृद्ध अनुभव निर्माण करतात.

पुणे हे भारतातील सर्वात प्रगत गृहनिर्माण बाजारांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. २०२१ ते २०२५ या काळात येथे ४.२८ लाखांहून अधिक घरांची विक्री झाली, जी देशातील सर्वाधिक आहे. आता नवीन घरांपैकी निम्मी घरे ही प्रीमियम आणि लक्झरी सेगमेंटमधील आहेत, जे ग्राहकांच्या बदलत्या आवडीचे दर्शन घडवते. लोक आता मॉड्युलर किचन आणि कनेक्टेड उपकरणांकडे वळत आहेत, ज्यामुळे किचन केवळ स्वयंपाकाची जागा न राहता एक 'स्मार्ट वातावरण' बनत आहे.

पुण्यात सीमेन्स च्या कामगिरीतही हे दिसून येत आहे. २०२५ मध्ये कुकिंग श्रेणीने एकूण विक्रीत जवळपास ६० टक्के वाटा उचलला आहे, ज्यामध्ये ओव्हन्सची मागणी निम्म्याहून अधिक आहे. डिशवॉशर्सची मागणीही मोठी आहे, तर २०२६ च्या पहिल्या सहामाहीत कूलिंग उपकरणांच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. बीएसएचचे लक्ष्य या वर्षाच्या अखेरीस देशभरात ४० सीमेन्स स्टोअर्स सुरू करण्याचे आहे. भारतात मॉड्युलर किचन आणि इन-बिल्ट उपकरणांची बाजारपेठ दरवर्षी २०-२५ टक्के दराने वाढत आहे.

या स्टोअरचे मुख्य आकर्षण सीमेन्स ची स्मार्ट कुकिंग उपकरणे आहेत, जसे की एआय युक्त कॅमेरा ओव्हन, स्टीम ओव्हन्स, आयक्यू ७०० डाऊनड्राफ्ट हूड आणि कनेक्टेड कॉफी मशिन्स. ही उपकरणे अतिशय शांतपणे आणि हुशारीने काम करून दैनंदिन कामे सोपी करतात.

## आषाढी एकादशीनिमित्त 'राजा पंढरीचा' कार्यक्रमातून होणार विठूनामाचा गजर

■ विठ्ठल नामाच्या गजरात रंगणार 'राजा पंढरीचा' संगीत मैफल

पुणे (दै. संध्या)

आषाढी एकादशीचे औचित्य साधत सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने 'राजा पंढरीचा' या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार १७ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, पद्मावती, पुणे येथे संपन्न होणार आहे. या विशेष कार्यक्रमामध्ये विठ्ठल भक्तीवरील भक्तिगीते, भावगीते तसेच लोकप्रिय चित्रपट गीतांचा सुरेल संगम रसिकांना अनुभवता येणार आहे. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून भक्तिभाव, अध्यात्म आणि संगीताचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी उपस्थितांना मिळणार आहे. कार्यक्रमात गायक राजेश दातार, सावनी दातार कुलकर्णी आणि स्वरदा गोडबोले आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

तसेच बासरीवादक अमर ओक यांची विशेष साथ लाभणार असून निरूपण मिलिंद कुलकर्णी राहणार आहेत. सदरील कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असून जास्तीतजास्त रसिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# २९ वर्षीय महिलेवर बहुविभागीय तज्ज्ञांच्या ट्रॉमा शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत सुधारणा

## आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

पुणे (दै. संध्या)



उंचावरून पडल्यामुळे जीवघेणी दुखापती झालेल्या २९ वर्षीय महिलेवर आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार झाले. तिच्यावर सात तास ३० मिनिटे चाललेल्या विविध बहू तज्ज्ञांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आलेली गंभीर दुखापतीवरील शस्त्रक्रिया आणि अतिदक्षता विभागातील (आयसीयु) उपचारांनंतर तिची उल्लेखनीयरीत्या प्रकृती सुधारली आहे. गंभीर स्वरूपाच्या पॉलीट्रॉमा (अनेक गंभीर दुखापती) असलेल्या या रुग्णांमध्ये तातडीचा ट्रॉमा उपचारांचा प्रतिसाद, विविध वैद्यकीय शाखांमधील समन्वय आणि समर्पित अतिदक्षता उपचार यांमुळे उपचारांचे परिणाम किती चांगले होऊ शकतात, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. ही महिला रोजंदारीवर काम करणारी मजूर असून उंचावरून पडल्यामुळे तिला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या वरच्या जबड्याला आणि चेहऱ्याच्या हाडांना गुंतागुंतीचे फ्रॅक्चर (ओरल अँड मॅक्सिलोफेशियल फ्रॅक्चर) झाले होते. तसेच बरगड्यांची अनेक हाडे मोडल्यामुळे तिच्या छातीचा काही भाग अस्थिर होण्याची अवस्था ज्याला वैद्यकीय भाषेत 'फ्लेल चेस्ट' म्हणतात ही जीवघेणी अवस्था निर्माण झाली होती. या स्थितीत बरगड्यांचा एक भाग छातीच्या भिंतीपासून वेगळा होतो. त्यामुळे श्वास घेणे अत्यंत कठीण होते आणि श्वसन निकामी होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. त्यामुळे शस्त्रक्रिया करण्यापूर्वी रुग्णाची प्रकृती तातडीने स्थिर करणे आवश्यक होते. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागाच्या संचालिका डॉ. उर्वी शुक्ला म्हणाल्या, "गंभीर पॉलीट्रॉमा असलेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रिया हा उपचारांचा केवळ एक भाग असतो. शस्त्रक्रियेनंतरचा कालावधी तितकाच महत्त्वाचा असतो, विशेषतः फ्लेल चेस्ट आणि अनेक फ्रॅक्चर असलेल्या रुग्णांमध्ये तो महत्त्वाचा असतो. रुग्ण बरा व्हावा यासाठी श्वसन क्रियेला योग्य आधार देणे, संसर्ग रोखणे, पोषण व्यवस्थापन आणि सातत्याने निरीक्षण करणे यावर आमचा भर होता. बहुविशेष शाखेतील पथकाने एकत्रितपणे प्रयत्न केल्यामुळेच हा उपचार यशस्वी झाला."

दुखापतींच्या गुंतागुंतीमुळे विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने या महिलेवर तब्बल सात तास ३० मिनिटांची शस्त्रक्रिया केली. यामध्ये छातीची स्थिरता पुन्हा मिळवण्यासाठी मोडलेल्या बरगड्या स्थिर करण्यात आल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## डॉ. अभ्यंकर, गुप्ता, अरविंद सुर्वे, दिलीप नारकर'जनसेवा रक्षक' पुरस्काराने सन्मानित

मुंबई (दैनिक संध्या) : पत्रकारिता, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात आर्यारवी एंटरटेनमेंट संस्था गेली १०वर्षे कार्यरत आहे.संस्थेचे अध्यक्ष लेखक-दिग्दर्शक,सिने-नाट्य अभिनेते, पत्रकार महेश्वर तेटांबे यांनी नुकताच दादर येथे आर्यारवी एंटरटेनमेंटच्या माध्यमातून पहिला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक,कला, साहित्य,समाजसेवक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला होता.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.त्याच अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व सामान्यांना सढळ हस्ते मदत करणारे ॲन्टीपायरी सेलचे मुख्य तपासी अधिकारी रामजित (जितू) गुप्ता,उषा हॉस्पिटलीटीचे संचालक, परोपकारी व्यक्तीमत्व समाजसेवक अरविंद सुर्वे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्याख्याते, समुपदेशक,लेखक डॉ.महेश अभ्यंकर, सिटीझन वेल्फेअर असोसिएशन संस्थापक सदस्य, महाराष्ट्र साहित्य समता परिषदेचे अध्यक्ष, राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर यांना जीवन सेवा रक्षक पुरस्काराने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.तसेच रामजित (जितू) गुप्ता, अरविंद सुर्वे, दिलीप नारकर,डॉ.महेश अभ्यंकर ही हरहुन्नरी,समाजउपयोगी जेष्ठ-श्रेष्ठ व्यक्तीमत्वे सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य कार्यरत असलेल्या जनजागृती सेवा संस्थेच्या जेष्ठ सल्लागारपदी कार्यरत आहेत.यांना हा जनसेवा रक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## फीफा विश्वचषक अंतिम सामन्याचा थरार अनुभवा आता एअरटेल वाय-फाय+ सोबत

■ पात्र ग्राहकांना फक्त २४ रुपयांमध्ये सामना पाहण्याची संधी

मुंबई (दैनिक संध्या) : फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना आता अगदी जवळ आला असून, देशभरातील देशभरातील फुटबॉल चाहते या मोठ्या सामन्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. याच पार्श्वभूमीवर एअरटेलने आपल्या वाय-फाय + टीव्ही (आयपीटीव्ही आणि डीटीएच) ग्राहकांना सामना पाहण्यासाठी एक सोपा आणि परवडणारा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, पात्र ग्राहक त्यांच्या सध्याच्या प्लॅनमधूनच फीफा विश्वचषक अंतिम सामन्याचा आनंद घेऊ शकतात किंवा फक्त 24 रुपये प्रति महिना देऊन युनाईट8 स्पोर्ट्स चॅनेल सुरू करू शकतात आणि हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये थेट सामना पाहू शकतात. एअरटेलने ग्राहकांना आवाहन केले आहे की, वेगळे स्ट्रीमिंग किंवा टीव्ही सबस्क्रिप्शन घेण्यापूर्वी एअरटेल ॲपवर जाऊन आपल्या सध्याच्या वाय-फाय + टीव्ही प्लॅनमध्ये कोणते फायदे मिळतात, ते तपासून पाहावेत. कंपनीचे 599 रुपये प्रति महिना पासून सुरू होणारे प्लॅन हाय-स्पीड फायबर ब्रॉडबँड, आयपीटीव्ही, ओटीटी ॲप्सचा प्रवेश आणि एअरटेल ॲपद्वारे सर्व सेवा एकाच ठिकाणी व्यवस्थापित करण्याची सुविधा देतात. त्यामुळे ग्राहकांना क्रीडा स्पर्धांसोबतच विविध मनोरंजनाचाही आनंद घेता येतो.

## सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा उत्साहात साजरा करु - अमोघ धाडगे

चाकण (दैनिक संध्या) : सालाबाद प्रमाणे याहीवर्षी सावता महाराजांचा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे, त्याबाबत चाकणकर ग्रामस्थांनी आपल्या सूचना कळवाव्यात, असे आवाहन उद्योजक अमोघ धाडगे यांनी केले आहे. धाडगे यांनी सांगितले की, संपूर्ण चाकण पंचक्रोशीतील माळी समाज बांधव संत शिरोमणी श्री सावता महाराज यांचा संजीवनी समाधी सोहळा प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करत असतो. त्याच पार्श्वभूमीवर यंदा सावता महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा ऑगस्ट महिन्यातील मंगळवारी (दि.११) येत आहे. त्या निमित्ताने समाज बांधवांनी हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी आपले अमूल्य विचार व सूचना असल्यास त्या सांगाव्यात, असे आवाहन अमोघ धाडगे यांनी माळी समाज बांधवाच्या वतीने केले आहे.

## कन्हेरी येथील पर्यटन उद्यानाचे "स्व. मा.अजितदादा पवार पर्यटन उद्यान" नामकरण

■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नामकरण फलकाचे १६ जुलै रोजी अनावरण

बारामती (दैनिक संध्या) : कन्हेरी येथील पर्यटन उद्यानाचे "स्व. मा.अजितदादा पवार पर्यटन उद्यान", ता. बारामती, जि.पुणे असे नामकरण करण्याबाबत राज्य शासनाच्या वन विभागाचा आज शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे; राज्याचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४ वा. या उद्यानाच्या नामकरण फलकाचे अनावरण करण्यात येणार आहे.

# 'शिक्षकांसाठी AI साथी' ऑनलाईन अभ्यासक्रमाचे मंत्रालयात उद्घाटन

## महाराष्ट्र शासनाचा अभिनव उपक्रम; कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या सहकार्याने 'दीक्षा' प्लॅटफॉर्मवर प्रशिक्षण उपलब्ध

मुंबई (दै. संध्या) :



राज्यातील शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांना तंत्रज्ञानामध्ये अधिक सक्षम करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), महाराष्ट्र यांच्या वतीने *"शिक्षकांसाठी AI साथी" (AI Saathi for Educators)* या अभिनव ऑनलाईन प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे दिमाखदार उद्घाटन आज मंत्रालयात पार पडले. शालेय शिक्षण विभागाचे *माननीय मंत्री दादाजी भुसे* यांच्या शुभहस्ते या महत्त्वपूर्ण अभ्यासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव श्री. रनजीत सिंह देवल, राज्याचे शिक्षण आयुक्त श्री. सचिंद्र प्रताप सिंह, SCERT चे संचालक डॉ. हेमंत वसेकर, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष श्री. नंदकुमार बेडसे, माध्यमिक शिक्षण संचालक श्री. महेश पालकर, प्राथमिक शिक्षण संचालक श्री. शरद गोसावी, परिषदेच्या उपसंचालिका श्रीमती वर्षाराणी भोपळे, उपविभाग प्रमुख श्री. राजेंद्र वाकडे, आयटी विभागाचे उपविभाग प्रमुख डॉ. संदीप मुळे आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशनच्या (Kotak Education Foundation) वतीने श्रीमती अलका पगारे, श्री. मिलिंद पांडे व श्री. दीपक पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

काय आहे 'AI साथी' उपक्रम?

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याला (NCF) अनुसरून शिक्षणात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढवणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. SCERT महाराष्ट्र आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम पूर्णपणे 'DIKSHA' (दीक्षा) प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विषयावर राज्यातील शिक्षक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेला हा पहिलाच व्यापक, प्रमाणित आणि राज्यस्तरीय अभ्यासक्रम ठरला आहे.

अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये:

स्वयंअध्ययन (Self-paced): हा एकूण सुमारे ४ तासांचा ऑनलाईन अभ्यासक्रम आहे.

कधीही, कोठेही उपलब्ध: शिक्षक आणि अधिकारी त्यांच्या सोयीनुसार मोबाईल, टॅबलेट किंवा संगणकाद्वारे हा कोर्स पूर्ण करू शकतात. त्यासाठी कोणत्याही प्रवासाची किंवा स्वतंत्र उपस्थितीची आवश्यकता नाही.

प्रमाणपत्र: अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ऑनलाईन चाचणी घेतली जाईल. ही चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्यांना DIKSHA प्लॅटफॉर्मद्वारे ऑनलाइन प्रमाणपत्र दिले जाईल.

प्रगत साधने व घटकांचा समावेश: अभ्यासक्रमामध्ये ChatGPT, Gemini, Copilot, Claude, MagicSchool, Canva AI, आणि Google Translate यांसारख्या आधुनिक AI साधनांचा शैक्षणिक वापर प्रत्यक्ष उदाहरणांसह शिकवला जाणार आहे.

शिक्षकांना आणि अधिकाऱ्यांना कसा होणार फायदा?

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर शिक्षकांना केवळ काही मिनिटांत दर्जेदार पाठ नियोजन (Lesson Planning) करणे, विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार प्रश्नपत्रिका, MCQ व मूल्यमापन साहित्य तयार करणे सहज शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे, शिक्षण विभागातील विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांना दैनंदिन पत्रव्यवहार, अहवाल लेखन, सादरीकरणे व प्रशासकीय कामे जलद गतीने आणि अचूकपणे हाताळण्यासाठी या प्रशिक्षणाचा मोठा फायदा होईल.

### महाराष्ट्राचे डिजिटल शिक्षणातील ऐतिहासिक पाऊल

या उपक्रमाबाबत बोलताना मान्यवरांनी सांगितले की, संपूर्ण राज्यामध्ये एकाच वेळी सर्व शिक्षकांसाठी आणि अधिकाऱ्यांसाठी एकसमान AI प्रशिक्षण उपलब्ध करून देणारा महाराष्ट्र हा देशातील अग्रगण्य राज्यांपैकी एक ठरला आहे. या प्राथमिक अभ्यासक्रमाच्या यशानंतर, पुढील टप्प्यात *'AI Saathi - Advanced'* हा अधिक प्रगत अभ्यासक्रम देखील विकसित केला जाणार आहे. हा उपक्रम राज्यातील लाखो शिक्षकांना आणि अधिकाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या युगात सक्षमपणे प्रवेश करून देणारा ठरेल, असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## पंढरीच्या वाटेवर वारकऱ्यांना चालण्याचे बळ देणारा चरणसेवा उपक्रम

बारामती (दै. संध्या) :



आषाढी वारीत सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावर विठुरायाच्या भेटीची आस लागत पंढरीकडे चालणारी पाऊले, या वारकऱ्यांच्या थकलेल्या चरणांची सेवा आणि त्या माध्यमातून पुढे चालण्यास मिळणारे बळ...थकलेल्या चरणांची सेवा.. वारकऱ्यांचा थकवा होतोय दूर... अशा चरणसेवा उपक्रमाला बारामती नगरीत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'चरणसेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. या वर्षीही सेवा केंद्रांवर डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक कार्यरत असून, औषधी आयुर्वेदिक तेल, रुग्णवाहिका सेवा करण्यात येत आहे. 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित पालखी विसावा ठिकाणी 'चरणसेवा' उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## एचडीएफसी बँक परिवर्तनने केली ९.६ लाख लोकांच्या जीवनात सुधारणा

मुंबई (दै. संध्या) :

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँक परिवर्तन या एचडीएफसी बँकेच्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत युवकांची कौशल्ये, ज्ञान आणि संधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करण्यात येत असून भारताच्या सध्याच्या बदलत्या अर्थव्यवस्थेमध्ये या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. सुरुवातीपासूनच बँकेच्या कौशल्यवृध्दी आणि जीवनव्यापन कार्यक्रमांनी ९.६ लाख लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे. एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन चा दृष्टिकोन हा कौशल्य विकासाची औपचारिक, प्रमाणनावर आधारीत प्रशिक्षण देऊन जीवनव्यापन आणि व्यावसायिक प्रशिक्षण हे स्थानिक स्तरानुसार आहे. त्यांच्या

HDFC BANK
We understand your world

बाजारपेठेतील भागीदार आणि एनएसडीसी प्रमाणित संस्थांच्या सहकार्याने विविध प्रमाणन कार्यक्रमांच्या माध्यमातून १.९६ लाख तरुणांना विविध क्षेत्रातील औपचारिक प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये आरोग्य, रिटेल, वाहतूक, आदरातिथ्य, बँकिंग, विमा, ईव्ही देखभाल, आयटी आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांबरोबरच त्यांना सॉफ्ट स्कील्स, डिजिटल साक्षरता, वित्तीय साक्षरता आणि नोकरीतही सहकार्य केले जाते, ज्यामुळे तरुणांना शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. बँकेने कौशल्याच्या या पध्दतींना सक्षम करत उपक्रमांचे अशा प्रकारे डिझाईन केले आहे ज्यामुळे तरुणाईला रोजगाराच्या संधी मिळतात विशेष करुन गरीब समाजासह तरुण मुलींना याचा अधिक लाभ होतो. तरुणांच्या कौशल्य विकासा बरोबरच एचडीएफसी बँक परिवर्तन ने त्यांच्या समाजावर आधारीत प्रशिक्षण, व्यावसायिक विकास आणि बाजारपेठेशी जोडलेल्या सहकार्याच्या माध्यमातून ७.६ लाख महिला आणि शेतकऱ्यांसाठीही संधी निर्माण केली आहे. हे सहकार्य विविध क्षेत्रात असून यामध्ये शिवणकाम, हस्तमाग, खाद्य प्रक्रिया, पोल्ट्री फार्मिंग, दुग्धव्यवसाय व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, मशरुम पिकवणे आणि अन्य सुक्ष्म व्यवसाय क्षेत्रांचा समावेश आहे. प्रशिक्षणा व्यतिरिक्त लाभार्थ्यांना मुल्य शृंखले मध्येही सहकार्य केले जात असून उपकरणे, देखभाल, उत्पादक संघ, ब्रॅन्डिंग, पॅकेजिंग आणि बाजारपेठेशी जोडणी इत्यादींचा समावेश आहे. बँकेच्या परिणामाच्या अभ्यासातून असे दिसून येते की अशा प्रकारच्या सहकार्यामुळे सहभागी लोकांवर चांगला आर्थिक परिणाम आणि सक्षमता निर्माण झाली आहे, विशेष करुन महिलांसह स्वयंसहायता गट तसेच व्यवसायावर आधारीत कार्यक्रमांमुळे उत्पन्न निर्मिती होऊन बचत होऊन आर्थिक स्वातंत्र्यात वाढ झाली आहे.

## हातिव मोहल्ल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे बळ

■ आमदार शेखर निकम यांच्या उपस्थितीत युवक-ग्रामस्थांचा पक्षप्रवेश, गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव





संगमेश्वर (दै. संध्या) :

हातिव मोहल्ला (ता. संगमेश्वर) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पक्षप्रवेश व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत युवक रेहान गडकरी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने युवक, महिला आणि ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करत पक्षाला भक्कम पाठबळ दिले. त्याचबरोबर विविध शैक्षणिक व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात आमदार शेखर निकम यांनी पक्षप्रवेश केलेल्या सर्वांचे स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी राजकारणाचा केंद्रबिंदू हा केवळ निवडणुका नसून जनतेचा सर्वांगीण विकास असल्याचे स्पष्ट केले. गावागावांत मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांवर भर देत विकासकामांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, "समाजाच्या प्रगतीचा खरा पाया शिक्षणात आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केल्याने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळते. प्रत्येक गावातील मुला-मुलींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. जनतेने माझ्यावर दाखविलेला विश्वास विकासकामांच्या माध्यमातून अधिक दृढ करण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहणार आहे." यावेळी त्यांनी चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघात पूर्ण झालेल्या तसेच सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्यावर भर देत विकासाची गती कायम ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला आरडीसी बँकेचे संचालक राजेंद्र सुर्वे, पंचायत समिती देवरुखचे उपसभापती प्रफुल्ल बाईत, हनिफशेठ हर्चीरकर, मंगेश बांडागळे, हुसेन बोबडे, प्रफुल्ल भुवड, नितीन भोसले, पंकज पुसाळकर, प्रतीक साळवी, यशवंत गोपाळ, बंधू सुर्वे, मानसी करंबेळे, अनिल पंजेरे, रूपाली पवार, बाबामिया जेठी, दीक्षा बांडागळे, उस्मान साटविलकर, मुजीब साटविलकर, रमजान साटविलकर, बशीर गडकरी, इब्राहिम गडकरी, आयुब साटविलकर, मुराद गडकरी, अहमद साटविलकर, उत्तम पवार, परशुराम घडशी, असलम धामस्कर, रामशेठ पंदेरे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमधील २४ उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई

पुणे (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागातील महानगरपालिका नगरपरिषद, नगरपंचायतींच्या निवडणुकांमधील २४ उमेदवारांवर निवडणूक खर्च सादर करण्यात कसूर केल्याबद्दल विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी पुढील ३ वर्षासाठी अपात्रतेची कारवाई केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडणूक लढविलेल्या सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या १, चाकण नगरपरिषदेच्या १० व फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदेच्या १३ अशा एकूण २४ उमेदवारांचा यात समावेश आहे. या २४ उमेदवारांनी अनुक्रमे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० (१ई) तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार ३० दिवसांच्या विहित मुदतीत निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केलेला नाही. पुणे विभागातील एकूण ६० नगरपरिषदा, नगरपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ व ६ महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणूक १४ जानेवारी २०२६ रोजी पार पडली आहे. पुणे महानगरपालिकेच्या २२, पंढरपूर नगरपरिषदेच्या १५ व अक्कलकोट नगरपरिषदेच्या ०३ असे एकूण ४० उमेदवारांवर विहित मुदतीत खर्च सादर न केल्याने ३ वर्षासाठी अपात्रतेची कारवाई शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार यापूर्वीच करण्यात आलेली आहे. आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका तसेच जिल्हा सह आयुक्त, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे १३ जुलै २०२६ रोजी संबंधिताना आपले म्हणणे दाखल करण्याबाबत सुनावणी घेण्यात आली.

## गृहमंत्र्यांनी संपूर्ण अमली पदार्थ परिसंस्था नष्ट करण्यासाठी रोडमॅप केला सादर

नवी दिल्ली (दै. संध्या) :




भारताच्या अंतर्गत सुरक्षेशी संबंधित गुंतागुंतीच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णायक नेतृत्वाचा विचार केला जातो, तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे नाव ठळकपणे समोर येते. स्पष्ट रणनीती, कालबद्ध नियोजन आणि परिणामाभिमुख अंमलबजावणी ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये बनली आहेत. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांना यशस्वीपणे निर्णायक टप्प्यावर नेल्यानंतर आता त्यांचे पुढील ध्येय म्हणजे भारताला अमली पदार्थ आणि नार्को-दहशतवादाच्या संपूर्ण परिसंस्थेतून मुक्त करणे हे आहे.

हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गृहमंत्र्यांनी केवळ अमली पदार्थांच्या जप्तीत वाढ करण्यापुरता मर्यादित न राहता, उत्पादन, तस्करी, वित्तपुरवठा आणि वितरण या संपूर्ण साखळीचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने व्यापक तीन वर्षांचा रोडमॅप तयार केला आहे.

या दृष्टीकोनातून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर (एनसीओआरडी)ची दहावी सर्वोच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीदरम्यान व्हिजन डॉक्युमेंट ऑन ड्रग कंट्रोल (2026–2029) प्रकाशित करण्यात आले, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) चा वार्षिक अहवाल सादर करण्यात आला आणि सुमारे ₹6,000 कोटी मूल्याचे जप्त करण्यात आलेले 2,09,500 किलोग्रॅम अमली पदार्थ नष्ट करण्यासाठी ऑनलाइन ड्रग डिस्पोजल फोर्टनाईट कॅम्पेन सुरू करण्यात आले. ही केवळ एक नियमित सरकारी बैठक नव्हती, तर ठोस कृतींना कालबद्ध रणनीतीची जोड देत "अमली पदार्थमुक्त भारत" या उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेनुसार अमित शाह यांनी "डिटेक्ट, डिसरप्ट अँड डिस्ट्रॉय" या तत्त्वावर आधारित स्पष्ट आणि बहुस्तरीय रणनीती तयार केली आहे. या धोरणाची सुरुवात अमली पदार्थांच्या नेटवर्कची अचूक ओळख पटविण्यापासून होते. त्यानंतर पुरवठा साखळी, आर्थिक पायाभूत व्यवस्था आणि कार्यप्रणाली विस्कळीत करून अखेरीस संपूर्ण परिसंस्थेचे अशा प्रकारे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट आहे की ती पुन्हा उभी राहू शकणार नाही. पुढील तीन वर्षांसाठी ही चौकट भारताच्या राष्ट्रीय अमली पदार्थविरोधी धोरणाचा मुख्य आधार ठरणार आहे.

अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भारताची अमली पदार्थविरोधातील मोहीम गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व वेगाने पुढे सरकली आहे. शून्य सहनशीलता आणि नेटवर्क-केंद्रित अंमलबजावणी या धोरणाच्या मार्गदर्शनाखाली, 2014 मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर भारताने सुमारे ₹1.84 लाख कोटी मूल्याचे अमली पदार्थ जप्त केले आहेत.


**फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद**

फुरसुंगी, ता. हवेली, जि. पुणे-412308

ई-मेल: fursungi.urulidevachinp२०२४@gmail.com

जा.क्र./फु.ऊ.दे.न.प/आ.वि/जा.नि/९७०/२०२६-२७ — दिनांक: १५/०७/२०२६

**फुरसुंगी-उरळी देवाची नगरपरिषद ता. हवेली जि.पुणे**

**जाहीर निविदा सुचना क्र.२ (२०२६-२७)**

फुरसुंगी-उरळी देवाची नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत खालील नमूद कामांच्या सर्वसाधारण निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा नगरपंचायतीच्या कार्यालयीन वेळेत दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी दहा वाजले पासून ते दिनांक २२/०७/२०२६ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत नगर परिषदेच्या कार्यालयात संबंधित विभागाकडे उपलब्ध होतील सीलबंद निविदा कार्यालयात आवक विभागाकडे दिनांक २२/०७/२०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत रोज करावी. निविदा त्याच दिवशी मुख्याधिकारी यांचे कार्यालयीन कक्षात देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम रुपये | काम पुर्ण करण्याची कालमर्यादा | निविदा फॉर्म रक्कम (फॉर्म फी + जीएसटी) |
|---|---|---|---|---|
| 1. | फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषद हद्दीत ड्रेनेज लाईन व इतर अनुषंगिक तसेच एसटीपीच्या जागांकरिता कंटूर सर्वे करणे कामी एजन्सी नेमणूक करणे. | १,०००/- | १५ दिवस | ६००/- |

सही/-
मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद

## थोडक्यात पण महत्वाचे...




### एटीएसचे छापे; पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीच्या नेटवर्कवर कारवाई, संशयित ताब्यात

पिंपरी(दैनिक संध्या) : दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या एका नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी महाराष्ट्रभर मोठी कारवाई हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यातील ६५ ठिकाणी, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरामध्ये २३ ठिकाणी एकाचवेळी धडक छापे टाकण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून संबंधित नेटवर्क कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅप यांसारख्या माध्यमांतून स्थानिक तरुणांशी संपर्क साधून त्यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. या पार्श्वभूमीवर एटीएसने व्यापक शोधमोहीम राबवत अनेक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. कारवाईदरम्यान मोबाईल फोन, लॅपटॉप, बँक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे तसेच इतर काही संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले असल्याचे समजते. दरम्यान, या नेटवर्कच्या संभाव्य देशविघातक हालचाली, आर्थिक व्यवहार आणि सोशल मीडियावरील संपर्कांची सखोल चौकशी सुरू असून एटीएसकडून पुढील तपास वेगाने करण्यात येत आहे. या कारवाईमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

### संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट निलंबित



पिंपरी(दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मोठी प्रशासकीय कारवाई करत पालिकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. या निर्णयामुळे महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये पर्यावरण प्रमुख संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांचा समावेश आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांना सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मोशी कचरा डेपो येथे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या चौकशीत संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याचे तसेच काही बेकायदेशीर बाबींना परवानगी दिल्याचे प्राथमिक निष्कर्ष समोर आल्याचे सांगितले जात आहे. याच आधारावर आयुक्तांनी ही कठोर कारवाई केली आहे. मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर प्रशासनाच्या भूमिकेवर विविध स्तरांतून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. त्यानंतर आयुक्तांनी जबाबदारी निश्चित करत ही तडकाफडकी कारवाई केली आहे.

### महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीची नगरसेवकांसह पाहणी करा : अनिता काटे



पिंपरी(दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येत असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असून, या प्रकल्पाची नगरसेवकांच्या उपस्थितीत अधिकृत पाहणी दौरा आयोजित करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका अनिता संदीप काटे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, नवीन प्रशासकीय इमारत लवकरच पूर्णत्वास जाणार असून भविष्यात महानगरपालिकेचे विविध प्रशासकीय कामकाज अधिक आधुनिक, सुसज्ज आणि प्रभावी पद्धतीने पार पाडण्यासाठी ही इमारत महत्त्वाची ठरणार आहे. या इमारतीमध्ये नागरिकांसाठी आवश्यक सुविधा, आधुनिक कार्यालयीन व्यवस्था, बैठक कक्ष, तांत्रिक सुविधा, पार्किंग व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा आणि इतर अनेक सोयी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्यामुळे त्याच्या कामाची गुणवत्ता, नियोजन आणि उपलब्ध सुविधांची लोकप्रतिनिधींमार्फत प्रत्यक्ष पाहणी होणे आवश्यक असल्याचे काटे यांनी नमूद केले आहे. नगरसेवक हे आपल्या प्रभागातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करत असल्याने त्यांना प्रकल्पाची प्रत्यक्ष माहिती मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या पाहणी दौऱ्यादरम्यान कामाच्या अंतिम स्वरूपाबाबत आवश्यक सूचना, सुधारणा आणि नागरिकांच्या दृष्टीने उपयुक्त बाबींवर चर्चा होऊ शकते. तसेच उर्वरित कामांमध्ये अधिक पारदर्शकता, गुणवत्ता आणि गती निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, नवीन प्रशासकीय इमारतीचा अधिकृत पाहणी दौरा लवकरात लवकर आयोजित करून नगरसेवकांना प्रत्यक्ष पाहणीची संधी द्यावी, अशी मागणी नगरसेविका अनिता काटे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### 78 व्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी. स्थानकात वृक्षारोपण

पिंपरी(दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त वल्लभनगर एस.टी. स्थानक प्रांगणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन, हरित विकास आणि वृक्षसंवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.



यावेळी महापौर रवि लांडगे यांनी वृक्षारोपण करून उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. ते म्हणाले, “आज लावलेले प्रत्येक झाड हे उद्याच्या पिढीसाठी दिलेली अमूल्य भेट आहे. वाढते शहरीकरण आणि बदलते हवामान लक्षात घेता वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्याचे आपले स्वप्न निश्चितच साकार होईल.” तसेच त्यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज व्यक्त केली. वृक्ष लागवड ही केवळ औपचारिकता न राहता त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास आगार व्यवस्थापक पल्लवी पाटील, स्थानक प्रमुख वैशाली कांबळे, कार्यशाळा प्रमुख राजगुरू, वाहतूक निरीक्षक कुलकर्णी, पर्यावरण जागर प्रतिष्ठानचे सचिव राजन जांभळे, अनंत तायडे तसेच एस.टी. महामंडळाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# डेंग्यू, मलेरियाविरुद्ध महापालिकेची व्यापक प्रतिबंध मोहीम

**स्वच्छता, डास प्रतिबंधावर विशेष भर; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन**

डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात करणे गरजेचे आहे. परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे तसेच वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे हीच सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरभर प्रतिबंधात्मक उपाय सातत्याने राबविण्यात येत असून नागरिकांच्या सहभागामुळेच निरोगी आणि स्वच्छ पिंपरी चिंचवडचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साध्य होईल असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यावेळी म्हणाले.

पिंपरी (दै. संध्या)



पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून शहरभर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता, जनजागृती आणि डास नियंत्रणाच्या विविध मोहिमा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. पावसाळ्यात साचलेले पाणी, अस्वच्छ परिसर तसेच दूषित अन्न व पाण्यामुळे संसर्गजन्य आजारांचा प्रसार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचणार नाही याची काळजी घेणे, पिण्याचे पाणी उकळून किंवा शुद्ध करून वापरणे तसेच अन्नपदार्थ नेहमी झाकून ठेवावे असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पाण्याच्या टाक्या, कुलर, फुलदाण्या, टायर तसेच इतर पाणी साचणाऱ्या वस्तूंची नियमित स्वच्छता करावी. नागरिकांनी आठवड्यातून किमान एकदा अशा ठिकाणांची तपासणी करून पाणी साचू देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेकडून डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी अळीनाशक औषधांची फवारणी, डासांचा नायनाट करण्यासाठी धूर फवारणी (फॉगिंग), घराघरांत सर्वेक्षण, जनजागृती मोहीम तसेच आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक औषध फवारणी नियमितपणे केली जात आहे. याशिवाय महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये संशयित रुग्णांची तपासणी आणि आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महापौर रवि लांडगे म्हणाले, "पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेच्या उपाययोजनांसोबतच नागरिकांचे सक्रिय सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. ताप, अंगदुखी, उलट्या, जुलाब किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून पाणी साचू न देण्याची काळजी घेतल्यास संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल." आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले, "पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याने प्रत्येक नागरिकाने स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपायांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

घर व परिसरात पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे आणि ताप किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महापालिका प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवत असून नागरिकांनीही सक्रिय सहकार्य करून निरोगी, स्वच्छ पिंपरी चिंचवड घडविण्यास हातभार लावावा.

## थेरगावात व्हॉट्सअ‍ॅपवर सुरू होता मटक्याचा धंदा

पिंपरी (दै. संध्या)

**■ गुन्हे शाखेच्या कारवाईत एकाला अटक**

थेरगाव गावठाण परिसरात व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून मटका जुगाराचे आकडे स्वीकारून ते पुढे पाठविणाऱ्या एका व्यक्तीवर गुन्हे शाखेच्या युनिट दोनने कारवाई केली. ही कारवाई सोमवारी (दि. १३) सायंकाळी साडेसातच्या सुमारास हनुमान मंदिरासमोरील थेरगाव गावठाण तालीम परिसरात करण्यात आली. आकाश हुसेन वाजंत्री (वय २९, रा. थेरगाव, पुणे) असे कारवाई करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर पिंटू सोनार (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) हा या प्रकरणात पाहिजे आरोपी असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आकाश हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ‘कल्याण’, ‘मिलन’, ‘राजधानी’ आणि ‘टाईम’ या नावाने चालणाऱ्या मटका जुगाराचे आकडे इतर व्यक्तींकडून व्हॉट्सअ‍ॅप मेसेजद्वारे स्वीकारत होता. हे आकडे तो पुढे पिंटू सोनार याला व्हॉट्सअ‍ॅपद्वारे पाठवत असल्याचा आरोप आहे. कारवाईदरम्यान आरोपी मटका जुगार खेळताना आढळून आला. त्याच्याकडून दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला. याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा क्रमांक २९२/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपी आकाश वाजंत्री याला बीएनएसएस कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात मोफत बसपास योजना

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना, तसेच महानगरपालिका हद्दीतील शासनमान्य खासगी शाळा व महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना घर ते शाळा व शाळा ते घर अशा स्वरूपाचा बसचा मोफत पास देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासनमान्य खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी बसपासच्या एकूण रकमेपैकी २५ टक्के रक्कम चलनाद्वारे महानगरपालिका कोषागारात भरून ते चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर केल्यानंतर बसपास देण्यात येणार आहे,यास महापालिका सभेने मान्यता दिली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात किमान ७५ टक्के उपस्थिती पूर्ण केलेली असावी. विद्यार्थ्यांच्या घरापासून शाळेचे अंतर किमान २ कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. ही योजना महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका व शासनमान्य खासगी शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे.

विद्यार्थ्यांनी निर्धारित नमुन्यातील अर्ज भरून रहिवासी पुरावा, आधार कार्ड अथवा इतर पत्ता असलेले ओळखपत्र, शाळेचे प्रमाणपत्र तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून संबंधित शाळेत जमा करावेत. खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी निर्धारित रक्कम पीएमपीएमएलच्या अधिकृत डेपोमध्ये भरून अर्ज सादर करावेत, तर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना बसपास पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत अर्ज वाटप व स्वीकार प्रक्रिया १५ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत होणार असून, बसपास तयार करणे व वितरण १५ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान करण्यात येईल. या बसपासचा लाभ ३० जून २०२७ पर्यंत उपलब्ध राहणार आहे.

महानगरपालिकेने सर्व मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी वेळेत सादर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, पालकांनीही निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून आपल्या पाल्यांसाठी मोफत बसपास योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

## ‘पीएमआरडीए’ची मोई येथे सर्वात मोठी कारवाई; ६८० अनधिकृत पत्राशेड जमीनदोस्त

**३५ हेक्टर क्षेत्र अतिक्रमणमुक्त; १,००० अधिकारी-कर्मचाऱ्यांसह २० तासांची विक्रमी धडक कारवाई**

पिंपरी (दै. संध्या)




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) खेड तालुक्यातील मोई येथे अनधिकृत पत्राशेडविरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी धडक कारवाई केली. सलग दोन दिवस चाललेल्या या मोहिमेत सुमारे ३५ हेक्टर क्षेत्रावरील ६८० अनधिकृत पत्राशेड जमीनदोस्त करण्यात आली. या धडक कारवाईमुळे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तसेच अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली १३ व १४ जुलै रोजी ही मोहीम राबविण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने चोख नियोजन केले होते.

या कारवाईसाठी ६५० पोलीस अधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे (एमएसएफ) ५० जवान, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सुरक्षा रक्षक आणि ‘पीएमआरडीए’च्या अग्निशमन दलाचे ३० जवान तैनात करण्यात आले होते. सुरक्षेच्या उपाययोजनांचा भाग म्हणून अग्निशमन दलाच्या तीन गाड्या आणि महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आले होते. जेसीबी, पोकलॅन मशीन आणि मजुरांच्या साहाय्याने अनधिकृत पत्राशेड हटविण्यात आली. पिंपरी-चिंचवड महापालिका, खेड येथील विद्युत पुरवठा विभाग, आरोग्य विभाग आणि खेड पंचायत समिती यांच्या समन्वयातून ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

‘पीएमआरडीए’ने मौजे मोई येथील ६८ गट क्रमांकांमधील अनधिकृत पत्राशेड व बांधकामांविरोधात धडक कारवाई करत, सुमारे ३५ हेक्टर क्षेत्रात पसरलेली तब्बल ६८० अनधिकृत पत्राशेड आणि अनधिकृत व्यावसायिक बांधकामे भुईसपाट केली.

## महापालिकेत झळकणार तैलचित्रे

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तसेच राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार, माजी आमदार दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव गुरुवारी (दि.१६) होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकारामुळे हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहोचला असून त्यांच्या मंजुरीनंतर ही तैलचित्रे महापालिकेच्या मुख्यालयात व सभागृहात झळकणार आहेत. महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या प्रस्तावानुसार, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात दिवंगत अजितदादा पवार व दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्यात येणार आहेत. तसेच, महापालिका सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार थेट पद्धतीने काम देण्यास मान्यता घेण्यात येणार आहे.

यापूर्वी महापालिका सभेने अजितदादा पवार व लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्यास मान्यता दिली होती. त्यानंतर महापौरांकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र सभागृहात लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार तिन्ही तैलचित्रे बसविण्याची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे.

# कर्जत, खालापूर तालुक्यातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

**खासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना**

पिंपरी (दै. संध्या)



> आपत्ती व्यवस्थापनाबाबतचे शासनाचे निर्देश पाळावेत. नुकसानग्रस्तांचे तातडीने पंचनामे करुन अहवाल पाठविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अहवाल आल्यानंतर शासनाकडून मदत मिळवून दिली जाईल.
> **- श्रीरंग बारणे, खासदार**

मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जत, खालापूर तालुक्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन, भाताची रोपे वाहून गेली आहेत. फळ बागांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत. त्याबाबतचा अहवाल तत्काळ शासनाला पाठविण्याचे आदेश मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा प्रशासकीय इमारत खालापूर येथे बुधवारी आढावा घेतला. कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय, आरोग्य, महावितरण सर्व विभागांची बैठक घेतली. आमदार महेंद्रशेठ थोरवे, उपविभागीय अधिकारी कर्जत खालापूर प्रकाश सकपाळ, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, कर्जत तहसीलदार धनंजय जाधव, कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, खोपोली नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज पाटील, खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय बांगर, गट विकास अधिकारी खालापूर संदिप कराळ, सार्वजनिक बांधकाम विभगगाचे उपविभागीय उप अभियंता संदेश पाटील, मोरबे नवी मुंबईचे कार्यकारी अभियंता संतोष उनवणे, तालुका आरोग्य अधिकारी कल्याणी इंगोले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता काळेल, एमआयडीसी पातळगंगा अग्निशमन दलाचे स्टेशन अधिकारी आशिष मोरे, खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रेशमताई मोडवे, शिवसेना खालापूर तालुका संपर्क प्रमुख विजाभाऊ पाटील, शिवसेना खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, शिवसेना महिला आघाडी खालापूर तालुका प्रमुख रेश्माताई आंग्रे, मोतीरा ठोंबरे, उमेश गायकवाड,रोहित विचारे व सबंधित अधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये ३, ४, ५, ६ जुलै रोजी अतिवृष्टी झाली. यामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन वाहून गेली, बंधारा फुटाला, भाताचे रोपे वाहून गेली. फळ बागांचे नुकसान झाले. या तालुक्यांमधील रस्ते, साकव, छोट्या पुलांवरुन पाणी गेले. पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणचे लोखंडी कठडे वाकले आहेत नदीलगत्याच्या स्मशानभूमीकडे जाणारे रस्ते वाहून गेले. खोपोली शहरातील अनेक भागात पाणी शिरले होते. पाणीपुरवठा योजना बंद पडली. त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. रस्ते दुरुस्त करावेत. दोन दिवस वीजपुरवठा खंडित झाला होता. त्याची तत्काळ दुरुस्ती करावी. पुन्हा वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. अतिवृष्टीत दोन्ही तुलक्यात चार जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांना शासनाच्या वतीने तत्काळ मदत केली आहे. नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचा अहवाल शासनाला सादर केल्यानंतर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळवून दिली जाईल.

खालापूर तालुक्यात माथेरान डोंगरालगत आदिवासीपाडे आहेत. तेथे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. येथील नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर लवकरच बैठक घेतली जाईल. राज्य शासनाच्या संबंधित मंत्र्यांबरोबरही बैठक घेतली जाणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

> नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. नुकसानग्रस्तांना मदत करावी. महावितरणचे अधिकारी जागेवर नसतात. महावितरणने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. वीजपुरवठा खंडीत होणार नाही, याची काळजी घ्यावी.
> **– महेंद्र थोरवे, आमदार**

## थोडक्यात पण महत्वाचे...



## ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ उपक्रमाचा शुभारंभ

बारामती (दैनिक संध्या) : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे दिनांक ११ जुलै २०२६ रोजी प्रेरणा सभागृहात क्विक हील फाउंडेशनच्या “सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा” या उपक्रमाचा उद्घाटन व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या प्रशिक्षण सत्रात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी जागरूकता, सुरक्षित डिजिटल वापराच्या पद्धती तसेच समाजामध्ये जनजागृती कशी करावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नव्याने निवड करण्यात आलेल्या सायबर वॉरियर्सचे प्रशिक्षण क्लब अधिकाऱ्यांकडून क्विक हील फाउंडेशनच्या मार्गदर्शक तत्वांनुसार घेण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर वॉरियर बॅचेस वितरित करण्यात आल्या. नव्याने निवड झालेल्या सायबर वॉरियर्स व क्लब अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना सायबर जनजागृतीसाठी सक्रियपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सायबर जनजागृती उपक्रमात सक्रिय सहभागघेण्याची प्रेरणा मिळाली. उपप्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक डॉ. अरुण मगर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले व महाविद्यालयाने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. एकूणच हा उद्घाटन कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून सायबर जनजागृतीच्या दिशेने आणखी एका प्रभावी वर्षाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सौ.सलमा शेख यांनी अश्विनी भोसले, तृप्ती भोसले, आसावरी कांबळे यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ज्योती गुरव हिने व आभार शिवरत्न गायकवाड याने केले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) व सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.


## अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यात आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन

■ नागरिकांना नावनोंदणी करण्याचे प्र अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरस्थित महात्मे आयबँक व आय हॉस्पिटल, एन्व्हॉयर्मेंटल फोरम ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात विविध आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती प्र. अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांनी दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे १९ ते २२ जुलै या कालावीत मोफत बिनटाका मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे. बारामती पंचक्रोशीतील रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया महात्मे ट्रस्टचे डॉक्टर्सच्यावतीने केली जाणार आहे. २२ व २३ जुलै रोजी प्रसिध्द सर्जन डॉ. मुफ्फजल लकडावाला व त्यांचे सहकारी हर्निया व इतर शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे करणार आहेत. महिलांच्या गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग व स्तन कर्करोगाची या शिवाय २० ते २७ जुलै दरम्यान तपासणी केली जाणार आहे. या व्यतिरिक्त इतरही तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत. तालुक्यात सांगवी व पणदरे येथे २२ जुलै आणि काटेवाडी व मोरगाव येथे २३ जुलै रोजी मोफत सर्वरोगनिदान शिबीर तसेच शारदा प्रांगण, जीटीएन कंपनी, पणदरे व सुपे येथेही रक्तदान शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे. या शिबीराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, अधिक माहिती माहितीकरिता नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा शासकीय रुग्णालयात नावनोंदणी करावी, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.

## प्रति दिंडी 20 हजार प्रमाणे 2 कोटी 80 लाखांचे अनुदान मंजूर

बारामती (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत गेल्या दोन वर्षापासून मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना देण्यात येणारे अनुदान यावर्षीही निरंतर सुरू ठेवण्यात आले असून विभागीय आयुक्त पुणे तथा व्यवस्थापकीय संचालक, मुख्यमंत्री वारकरी महामंडळ यांच्या देखरेखीखाली या निधीचे थेट बँक खात्यात वाटप सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत नव्याने स्थापन झालेल्या "मुख्यमंत्री वारकरी महामंडळ" मार्फत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी वारी सन २०२६ करीता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना दिलासा देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. २ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार यावर्षी वारीकरीता येणाऱ्या दिंड्यांना प्रत्येकी रु. २० हजार प्रमाणे एकूण रु. २ कोटी ८० लाख रुपये इतके वित्तीय अनुदान वितरित करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची आणि भक्ती मार्गाची शेकडो वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. या वारीमध्ये प्रामुख्याने कष्टकरी, शेतकरी आणि कामगार बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात. वारकरी बांधवांना सुयोग्य सोयी-सुविधा पुरवणे तसेच वारीचे सूक्ष्म व नेटके नियोजन करणे या हेतूने शासनाने दिंड्यांना अनुदान देण्यास सुरुवात केली आहे. चालू वर्षामध्ये एकूण १ हजार ४०० दिंड्यांना हे अनुदान वितरित करण्याचे उद्दिष्ट असून, प्राप्त अधिकृत माहितीनुसार सद्यस्थितीत एकूण १ हजार १९९ पात्र दिंड्यांपैकी १ हजार दिंड्यांचे बँक तपशील प्राप्त झाले असून त्यांच्या खात्यात थेट रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे. उर्वरित १९९ दिंड्यांच्या बँक खात्यांचे तपशील प्राप्त होताच तात्काळ निधी वर्ग करण्यात येईल. तसेच वारीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ४१ नवीन दिंड्यांच्या बाबतीतही आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे. ज्या दिंड्यांचे बँक तपशील अद्याप प्राप्त झालेले नाहीत, अशा दिंडी प्रमुखांनी आपले बँक खाते आणि आवश्यक तपशील संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे किंवा विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावेत, जेणेकरून अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात विनाविलंब जमा करता येईल,असे आवाहन मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.




## शिवाजी महामुनी यांचे निधन

सासवड (दैनिक संध्या) : वनपुरी ( ता. पुरंदर ) येथील रहिवासी आणि सामाजिक कार्यकर्ते शिवाजी नारायण महामुनी यांचे नुकतेच आकस्मिक निधन झाले. त्यांचे वय ५३ वर्षांचे होते. सुतार व्यावसायिक म्हणून ते सर्वत्र परिचित होते. त्यांच्या पाठीमागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ, दोन बहिणी, चुलते, पुतणे, भाचे, चुलत भाऊ, चुलत बहिणी असा मोठा परिवार आहे. मांडवी ( ता. हवेली ) येथील डॉक्टर प्रकाश महामुनी, माजी ग्रामपंचायत सदस्य आणि पत्रकार संभाजी महामुनी तसेच सामाजिक कार्यकर्ते तानाजी महामुनी यांचे ते बंधू होत.

# संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे बारामती नगरीत स्वागत

बारामती (दै. संध्या)



जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज बारामती शहरामध्ये 'ज्ञानोबा माऊली तुकाराम..ज्ञानोबा माऊली तुकाराम... च्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पाटस रोडवरील देशमुख चौकात प्रशासनाच्यावतीने पालखी रथ आणि दिंड्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशारे माने, मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

नगरपरिषेदेकडून वारकऱ्यांसाठी सुविधा आषाढी वारीकरीता येणाऱ्या वारकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नगरपरिषदेने पूर्वतयारी केली आहे. शारदा प्रांगण वारकऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नगर परिषदेच्या प्रांगणात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षा मार्फत सुरु करण्यात आलेल्या ' चरण सेवा ' तसेच वैद्यकीय सेवा, ग्रामविकास विभागाकडून फुट मसाज करण्याची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालखी मार्गावरील सर्व रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली आहे. शहरात विविध ठिकाणी फिरत्या शौचालयाची सोय करण्यात आली आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण करून संपूर्ण शहरात धूर फवारणी करण्यात आली आहे. 'हरित वारी-सुरक्षित वारी' च्या माध्यमातून शहरात वृक्षारोपण करण्यात येत आहे. शहरात प्लास्टिकमुक्त बारामती, प्रदूषणमुक्त वारी व पर्यावरण हरित संतुलनासाठी जनजागृतीविषयक उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरात कचरा कुंडी, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, सूचना फलक, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आदी व्यवस्था करण्यात आली असून ध्वनीक्षेपकाद्वारे सूचनाही देण्यात येत आहे.

बारामती शहरात चौकाचौकात विविध संस्था संघटना यांच्याकडून पालखी रथाचे व दिंड्याचे स्वागत करण्यासाठी मंडप उभारण्यात आले आहेत. काही सेवाभावी संस्थांकडून वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवा, अल्पोपहार, फळे, पाणी पुरवठा व इतर सेवा पुरवण्यात येत आहेत.

या पालखी सोहळ्यात महाराष्ट्र शासनाचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, आरोग्य विभाग, कौशल्य व उद्योजकता विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, वन विभाग आदी विभागांच्या चित्ररथातून शासनाच्या योजनांविषयी जनजागृती करण्यात येत असून या चित्ररथास वारकऱ्यांचा आणि नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## मनपा सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वाटप

कोरेगावमुळ (दै. संध्या)



■ सुरेंद्र पठारे फाउंडेशन, तनिष्का फाउंडेशन व डेक्कन मिररचा संयुक्त सामाजिक उपक्रम

पावसाळ्यात प्रतिकूल हवामानात शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या वाघोली येथील महानगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सुरेंद्र पठारे फाउंडेशन, तनिष्का फाउंडेशन आणि डेक्कन मिरर यांच्या संयुक्त विद्यमाने रेनकोटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवेला सन्मान देत त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेबाबत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. शहराची स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी पाऊस, वारा किंवा अन्य प्रतिकूल परिस्थितीतही सफाई कर्मचारी सातत्याने सेवा बजावत असतात. त्यांच्या कामात पावसाळ्यात अनेक अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर दर्जेदार रेनकोटचे वितरण करून त्यांच्या कामाला अधिक सुरक्षित आणि सुलभ वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. यावेळी नगरसेवक सुरेंद्र पठारे, तनिष्का फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष अनिल जाहीर, नगरसेविका ऐश्वर्याताई पठारे, आदर्श पत्रकार दिपक नायक, अशोक क्षिरसागर, ॲड. संदीप नायक तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विविध स्पर्धा परीक्षांच्या बक्षीस वितरण समारंभास उत्स्फूर्त प्रतिसाद

ओतूर (दै. संध्या)



प्रगती क्लासेस, ओतूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक आणि स्पर्धात्मक विकासाला चालना देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांच्या बक्षीस वितरण समारंभाचा सोहळा रविवारी १२ जुलै शुभश्री लॉन्स, ओतूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी आय.एम. विनर, विनर ऑफ द इयर, मंथन, इंग्रजी ग्रामर, लक्षवेध, प्रज्ञावंत, भारत टॅलेंट सर्च आणि ब्रेन डेव्हलपमेंट या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्य, जिल्हा, तालुका व केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या २५२ विद्यार्थ्यांचा, तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा आणि इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, धनादेश व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या स्पर्धांमध्ये जुन्नर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी, आत्मविश्वास वाढावा आणि त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने प्रगती क्लासेसतर्फे दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन केले जाते.

कार्यक्रमात प्रगती क्लासेसच्या संचालिका सौ. सोनाली निलेश टिकेकर आणि सौ.तनुजा चेतन नलावडे यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यश संपादन करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

या समारंभाला जिल्हा परिषद सदस्या डॉ. सौ. छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, रोहोकडी केंद्राच्या केंद्रप्रमुख सौ. सुदेशना सर्जेराव गाढवे, चैतन्य विद्यालयाचे स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख श्री.भाऊसाहेब खाडे, जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश तिटमे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, खेड वन परिमंडळ अधिकारी श्री. संतोष बिरादार तसेच ॲड. सौ.आरती नलावडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच अनेक मान्यवर आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.गणेश मोढवे यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करताना त्यांना भविष्यातील स्पर्धा परीक्षांसाठी प्रेरणा देणारा हा समारंभ उत्साहात आणि दिमाखात पार पडला.

## सोरतापवाडी येथे भरधाव कारच्या धडकेत मजूर गंभीर जखमी

उरुळी कांचन (दै. संध्या)

**उरुळी कांचन पोलिसांत गुन्हा दाखल**

पुणे-सोलापूर महामार्गावरील सोरतापवाडी (ता. हवेली) परिसरात भरधाव कारने पादचाऱ्याला धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे. अपघातानंतर जखमी व्यक्तीला कोणतीही मदत न करता कारचालक वाहनासह घटनास्थळावरून निघून गेला. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी रघुनाथ कुमार मुखिया (वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. सोरतापवाडी, ता. हवेली, जि. पुणे, मूळ रा. बिहार) यांनी फिर्याद दिली आहे. सोमवार ता. 13 जुलै रोजी सायंकाळी सुमारे 4 वाजण्याच्या सुमारास रघुनाथ कुमार मुखिया हे पुणे-सोलापूर रोड क्रॉस करून सोरतापवाडी गावाकडे जात असताना सोलापूर बाजूकडून पुणे बाजूकडे जाणारी हुंडाई कंपनीची अल्काझर कार (क्र. एमएच 12 एक्स ई 3207) ही भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून चालकाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादी यांच्या डाव्या हाताला, खांद्याला, डाव्या पायाला व डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर कारसह चालकाने पुणे दिशेने पलायन केले.

याबाबत रघुनाथ कुमार मुखिया यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उरुळी कांचन पोलीस स्टेशन मध्ये मोटार वाहन कायदा कलम तसेच विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश भोसले करत आहेत.

## उरुळी कांचनमध्ये ‘आरोग्यवारी’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

उरुळी कांचन (दै. संध्या)

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्या सोबत पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या वारकरी बांधवांसाठी आरोग्यसेवेचा संकल्प ना.चंद्रकांत पाटील व राजेश दादा पांडे संचलित समर्थ युवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'मोफत आरोग्य तपासणी – आरोग्य वारी' या उपक्रमास उरुळी कांचन येथ उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. NYCS मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी,उरुळी कांचन शाखा येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित शिबिरात २३० नागरिकांची विविध प्रकारची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच १४ महिला भगिनींची मॅमोग्राफी (स्तन कर्करोग तपासणी) करण्यात आली.



## नीरा नदीकाठी भक्तीचा महासागर

### संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे शाहीस्नान उत्साहात

पुणे (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी पालखी सोहळ्यातील अत्यंत भावपूर्ण आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेला शाहीस्नान सोहळा आज पुरंदर तालुक्यातील नीरा नदीच्या पवित्र तीरावर भक्तिमय वातावरणात पार पडला. दुपारच्या विसाव्यानंतर दुपारी एक वाजता माऊलींचा सोहळा नीरा स्नानासाठी मार्गस्थ झाला. यावेळी नीरा नदीवरील जुन्या ब्रिटिशकालीन पुलावरून जात असलेल्या पालखी सोहळ्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी वारकरी आणि भाविकांनी मोठी गर्दी केली होती."माऊली... माऊली..." च्या अखंड जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सोहळामालक राजाभाऊ आरफळकर यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुका घेऊन हरीनामाच्या गजरात नीरा नदीवरील दत्त घाटावर आणल्या. पादुकांच्या दर्शनासाठी आणि शाहीस्नानाचा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी घाट परिसर भाविकांनी फुलून गेला होता.

# ग्रामपंचायत नारायणगावने केले ५०० वृक्षांचे रोपण

नारायणगाव (दै. संध्या)




ग्रामपंचायत नारायणगाव आणि 'जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनल असोसिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बुधवारी भव्य वृक्षरोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमांतर्गत गणपीर बाबा टेकडी येथे तब्बल ५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. जुन्नर तालुक्याचे आमदार श्री. शरददादा सोनवणे यांच्या शुभहस्ते या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ झाला. "पर्यावरण संवर्धनासाठी आजचा संकल्प, हिवरेगार उद्याचा संकल्प" ही मुख्य संकल्पना डोळ्यासमोर ठेवून हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या सौ. नेहाताई योगेश पाटे, पंचायत समिती सदस्या सौ. सुषमा अर्जुन वाव्हळ, सौ. जयश्रीताई बनकर, आर.एफ.ओ. श्री. प्रदिप चव्हाण, सूर्यकांत हॉस्पिटलचे श्री. डॉ. प्रदिप जोशी, ए.पी.आय. श्री. प्रविण सपांगे, मंडल अधिकारी सौ. शितल गर्जे, विघ्नहर सहकार साखर कारखान्याचे संचालक श्री. संतोषनाना खैरे, मा. जिल्हा परिषद सदस्य माऊली खंडागळे, नारायणगावच्या लोकनियुक्त सरपंच डॉ. शुभदाताई वाव्हळ आणि उपसरपंच श्री. योगेश (बाबूभाऊ) पाटे, ग्रामपंचायत सदस्या भवनाताई बेल्हेकर, सौ बिर्मल,तसेच सदस्य आरिफभाई आतार , संतोष दांगट ,गणेश पाटे, जंगल कोल्हे, डॉ.डोळे, डॉ.घोरपडे, डॉ.काचळे, डॉ.शिंदे, डॉ.घाडगे, डॉ.खैरे,डॉ.गुळवे,अजित वाजगे, जालिंदर खैरे यांसह अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धन आणि निसर्गाचा समतोल राखणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी नारायणगावचे उपसरपंच श्री योगेश पाटे यांनी वृक्षारोपण आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देत , सर्वांनी देशी वृक्ष लावले पाहिजे असे सांगितले.

या उपक्रमामुळे येत्या काळात नारायणगाव आणि परिसर अधिक हिरवागार आणि प्रदूषणमुक्त होण्यास मोठी मदत होणार आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीने लावलेल्या आंबा, पेरू,जांभूळ, सिताफळ,पिंपळ, आवळा, चिंच या विविध प्रकारच्या झाडांमुळे ऐन उन्हाळ्यातही गणपीर टेकडी हिरवीगार झाली असून आता पुन्हा फणस,आंबा व विविध वनऔषधी ५०० झाडांची लागवड सुरू करण्यात आल्यामुळे संपूर्ण गणपीर टेकडी हिरवीगार होऊन पर्यावरणाला याचा मोठा फायदा होणार आहे. ग्रामपंचायत नारायणगावच्या वतीने १०,००० झाडांची लागवड व वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला नारायणगावचे समस्त ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## सर्वसमावेशक धोरण तयार करणार : दत्तात्रय भरणे

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध व्हावे, निकृष्ट अथवा बनावट बियाण्यांमुळे त्यांचे नुकसान होऊ नये आणि बियाणे उत्पादन, साठवणूक, तपासणी व विक्री प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण व्हावे, यासाठी सर्व संबंधितांच्या सूचनांचा विचार करून राज्य शासन सर्वसमावेशक धोरण तयार करणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. मंत्रालयात बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत (SOP) बदल करून नवीन मानक कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस दूरदृश्यप्रणालीव्दारे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार भास्कर जाधव, कैलास घाडगे पाटील, हेमंत ओगले, हरीश पिंपळे, सुमित वानखेडे, रणधीर सावरकर, समीर कुणावार, राजेश बकाने, सई प्रकाश डहाके, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप स्वामी, कृषी संचालक सुनिल बोरकर, उपसचिव संतोष कराड उपस्थित होते.



## कृष्णा स्वामीनाथन यांनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय नौसेनेचे नवनियुक्त प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी ॲडमिरल स्वामीनाथन यांचे नौदल प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबददल अभिनंदन केले, तसेच स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला.

## पदभरती प्रक्रिया वेगात पूर्ण करावी : विखे पाटील

मुंबई (दैनिक संध्या) : महात्मा फुले कृषी विद्यापीठाची 2025 मध्ये सुरू करण्यात आलेली पद भरती प्रक्रिया वेगात पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मंत्रालयात जनसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राहुरी कृषी विद्यापीठाशी संबंधित विषयांबाबत बैठक झाली. या बैठकीस कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार प्राजक्त तनपुरे, कृषी सचिव परिमल सिंह , उपसचिव प्रतीक्षा पाटील, वित्त आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राहुरी येथील कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे दूरदृश्यप्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

# हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांसाठी अर्ज करा

■ मुंबई (दै. संध्या)

अनुसूचित जाती प्रवर्गातील हिंदू खाटीक समाजातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, उद्योग तसेच उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध कर्ज व अनुदान योजना राबविण्यात येत आहेत.

या योजनांच्या लाभासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर करावेत, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

महामंडळाच्या ५० टक्के अनुदान योजनेत एकूण प्रकल्प खर्च ५०,०००/- असून त्यापैकी २५,०००/- अनुदान आणि २५,०००/- बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या योजनेद्वारे लघु व्यवसाय, सूक्ष्म उद्योग तसेच उपजीविकेस पूरक उपक्रमांना चालना दिली जाते.

बीज भांडवल योजनेत ५०,००१/- ते ५,००,०००/- पर्यंतच्या प्रकल्पांसाठी महामंडळाचा २० टक्के सहभाग असून त्यामध्ये जास्तीत जास्त ५०,०००/- अनुदान व बीज भांडवल ५०,०००/-




दिले जाते. बँकेचा ७५ टक्के (३,७५,०००/-) सहभाग असून कर्ज बँकेच्या विद्यमान व्याजदराने उपलब्ध होते. लाभार्थ्याचा ५ टक्के (२५,०००/-) सहभाग असून कर्ज परतफेडीचा कालावधी ३ ते ५ वर्षे आहे. या योजनेमुळे लाभार्थ्यांना स्थिर व टिकाऊ व्यवसाय उभारण्यास मदत होते.

थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १,००,०००/- पर्यंत कर्ज वार्षिक ४ टक्के व्याजदराने उपलब्ध करून दिले जाते. या योजनेत प्रकल्प खर्च १००,०००/-, महामंडळाचा ५० टक्के सहभाग (अनुदान जास्तीत जास्त ५०,०००/-), थेट कर्ज ४५ टक्के (४५,०००/-) आणि लाभार्थी सहभाग ५ टक्के (५,०००/-) आहे. ही योजना जलद व सुलभ पद्धतीने राबविण्यात येत असल्याने लाभार्थ्यांना अल्पावधीत व्यवसाय सुरू करता येतो.

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एनएसएफडीसी), नवी दिल्ली यांच्या माध्यमातूनही विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांमध्ये १,४०,०००/- ते ५,००,०००/- पर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. एकूण प्रकल्पाच्या ९० टक्के निधीची तरतूद एनएसएफडीसीमार्फत केली जाते. तसेच जास्तीत जास्त ५०,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते, तर उर्वरित रक्कम बीज भांडवल स्वरूपात उपलब्ध करून दिली जाते. या योजनेत अर्जदाराचा कोणत्याही स्वरूपात आर्थिक सहभाग नाही.

(एनएसएफडीसी) शैक्षणिक कर्ज योजनेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी महामंडळाच्या नियम, अटी व शर्तीनुसार १०,००,०००/- ते ४०,००,०००/- पर्यंत कर्ज उपलब्ध आहे.

तसेच (एनएसएफडीसी) मुदत कर्ज योजना व सूक्ष्म पुरवठा कर्ज योजनेत १,४०,०००/- ते ३,००,०००/- पर्यंत कर्जाची तरतूद असून ती महामंडळाच्या नियम, अटी व शर्तीनुसार दिली जाते.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता :

१. अर्जदार अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्ष असावे.
२. वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी रु ३.०० लाख एवढी आहे.
३. अर्जदार हा या महामंडळाच्या योजनांचा व इतर वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे :

१. जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखला.
२. पासपोर्ट आकाराचे फोटो
३. रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड प्रत.
४. कोटेशन व व्यवसायासाठी असलेल्या आवश्यक असलेल्या जागेचा पुरावा, व्यवसायानुसार इतर दाखले.
५. आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल.
६. बँक खाते क्रमांक पासबुकची झेरॉक्स प्रत.

वरील सर्व योजनांची सविस्तर माहिती. अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची यादी व पात्रतेच्या अटी महामंडळाच्या महादिशा पोर्टलवर उपलब्ध आहेत. तरी सर्व इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज करण्यापूर्वी माहिती नीट वाचून घेणे आवश्यक आहे. तरी जास्तीत इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘व्हीबी-जी राम जी’ योजनेची पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणी करा

## रोहयो मंत्री भरत गोगावले : विभागनिहाय कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

‘व्हीबी-जी राम जी’ या नवीन योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शासन पातळीपासून गाव पातळीपर्यंतच्या संपूर्ण यंत्रणेने सतर्कता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखावे. यंत्रणेचा कोणत्याही स्तरावर गैरफायदा घेतला जाणार नाही, याची दक्षता घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले. सर्व यंत्रणांना या योजनेची सविस्तर माहिती होण्यासाठी विभागनिहाय कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात असे निर्देशही त्यांनी दिले. ‘व्हीबी-जी राम जी’ योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आयुक्त श्रीमती अनिता मेश्राम, सहसचिव अतुल कोदे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी



उपस्थित होते. रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रशासकीय त्रुटींमुळे मजुरांची देणी थकणार नाहीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. कामांना केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी हस्तांतरण व व्यवस्थापनाशी संबंधित प्रक्रिया विहित कालावधीत आणि पूर्ण पारदर्शकतेने पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या सर्व कामांची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेत सादर करावीत तसेच प्रत्येक कामाचा संबंधित यंत्रणांनी नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. योजनेची माहिती सर्व संबंधित घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी यासाठी पहिल्या टप्प्यात पुढील महिन्यात विभागनिहाय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले. या कार्यशाळांमध्ये संबंधित यंत्रणा, गावपातळीवरील लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा सहभाग असणार आहे. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरावर अशा कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. कोकण विभागाची भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन योजनेतील कामांच्या स्वरूपात आवश्यक ते अनुषंगिक बदल करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. योजनेची अंमलबजावणी स्थानिक परिस्थितीनुसार अधिक परिणामकारक होईल, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना मंत्री गोगावले यांनी यावेळी दिल्या.

# मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदीच्या सहायक अनुदानात दुप्पट वाढ

■ मुंबई (दै. संध्या)

कारावासाची शिक्षा पूर्ण केलेले मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदी यांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत सहायक अनुदान योजना राबविण्यात येते. या बंदीवानांच्या अनुदानात दुप्पट वाढ करून ती रू.२५ हजार अनुदानावरून आता रू.५० हजार इतकी करण्यात आली आहे. तसेच या योजनेत आता, निर्दोष मुक्त झालेल्या परंतु किमान एक वर्ष शिक्षा भोगलेल्या बंदींचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. या योजनेचा उद्देश शिक्षा पूर्ण करून किंवा निर्दोष मुक्त होऊन समाजात परतलेल्या व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यांना पुन्हा



■ निर्दोष बंद्यांनाही पुनर्वसनासाठी आता मिळणार ५० हजार रूपयांचे अनुदान – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

गुन्हेगारीकडे वळण्यापासून परावृत्त करणे हा आहे. तसेच मानवतेच्या दृष्टीकोनातून, किमान एक वर्ष कारावास भोगल्यानंतर निर्दोष मुक्त झालेल्या व्यक्तींनाही या योजनेचा लाभ देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी बालगृहांची सुविधा उपलब्ध करा : आदिती तटकरे

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील ऊसतोड कामगार स्थलांतरित होत असताना त्यांच्या मुलांना संबंधित जिल्ह्यांतील बालगृहांमध्ये तात्पुरता निवारा उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. राज्यातील बालगृहांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी



मंत्रालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालगृह उपलब्ध करून दिल्यास स्थलांतराच्या काळात मुलांचे, विशेषतः मुलींचे शिक्षण अखंडित राहिल आणि बालविवाहाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, ऊसतोड कामगारांना दिलासा मिळेल. परभणी, वाशिम, जालना, बीड आदी ऊसतोड कामगारांचे स्थलांतर अधिक असलेल्या जिल्ह्यांमध्ये या मुलांसाठी बालगृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करावी. तसेच बंद असलेली बालगृहे, विशेषतः मुलींसाठी, पुन्हा सुरू करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देशही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. राज्यातील बालगृहांच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक तीन ते सहा महिन्यांनी एका महसुली विभागातील बालगृहांची तपासणी दुसऱ्या महसुली विभागातील अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी, असे निर्देशही मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

# मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

■ मुंबई (दै. संध्या)

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय, मुंबई शहर व उपनगर मार्फत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५० टक्के अनुदान योजना, बीज भांडवल योजना तसेच थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या लाभासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पात्र लाभार्थ्यांनी ऑन लाइन अर्ज सादर करावेत असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक सहाय्य व सामाजिक उन्नतीच्या उद्देशाने महामंडळ विविध स्वयंरोजगाराभिमुख योजना राबवत आहे. प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना अंतर्गत लाभार्थ्यांच्या स्वयंपूर्णतेला चालना देऊन त्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न या योजनांद्वारे करण्यात येत आहे. लाभार्थ्यांनी https://mpbcdc.maharashtra.




gov.in किंवा https://mahadisha.in या संकेतस्थळाच्या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरावेत. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत. अपूर्ण अथवा कागदपत्रांविना सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. ५० टक्के अनुदान योजना – एकूण प्रकल्प खर्च ५०,०००/-, महामंडळाचे अनुदान २५,०००/-, बँक कर्ज २५,०००/-. या योजनेद्वारे लघु व्यवसाय, सुक्ष्म उद्योग व उपजीविकेस पूरक अशा उपक्रमांना चालना दिली जाते. बीज भांडवल योजना – प्रकल्प खर्च ५०,००१/- ते ५,००,०००/-, महामंडळ सहभाग. २० टक्के (जास्तीत जास्त ५०,०००/- अनुदान + बीज भांडवल ५०,०००), बँक सहभाग ७५ टक्के ३,७५,०००/- (बँकेच्या विद्यमान व्याजदराने कर्ज), लाभार्थी सहभाग: ५ टक्के २५,०००/ आणि

कर्ज परतफेडीचा कालावधी ३ ते ५ वर्ष आहे. या योजनेद्वारे उद्योजकता विकसित करण्यासाठी उपयुक्त असून, लाभार्थ्यांना स्थिर व टिकाऊ व्यवसाय उभारता येतो.

थेट कर्ज योजना – महामंडळामार्फत थेट कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १००,०००/- पर्यंत कर्ज वार्षिक ४ टक्के व्याजदराने उपलब्ध करून दिले जाते. ही योजना जलद व सुलभ पद्धतीने अंमलात आणली जाते. ज्यामुळे अल्पावधीतच लाभार्थ्यांना व्यवसाय सुरू करता येतो. या योजनेसाठी प्रकल्प खर्च १००,०००/-, महामंडळ सहभाग : ५० टक्के (अनुदान जास्तीत जास्त ५०,०००/-), थेट कर्ज रक्कम ४५ टक्के (४५,०००/-), लाभार्थी सहभाग ५ टक्के (५,०००/-) असा आहे.

या योजनांच्या लाभासाठी पात्र लाभार्थ्यांनी मुदतीत ऑनलाइन अर्ज करून शासनाच्या स्वयंरोजगार योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ : कर्जमुक्ती आता अधिक व्यापक

**शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६’ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती...**

विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

■ (दै. संध्या)

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६’ जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस “पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना” हे नाव देऊन शासनाने त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून याद्दष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती. या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना’ लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना‘ ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विठूरायाच्या दर्शनासाठी वाल्मीकींचा पालखी सोहळा मार्गस्थ

वाल्हे (दैनिक संध्या) : सुखा लागी करीसी तळमळ ! तरी तु पंढरीसी जाय एकवेळ !! मग अवघाची सुखरूप होसी ! जन्मोजन्मीचे दु:ख विसरसी !! विठुरायाच्या दर्शनाला आतुर झालेला महर्षी वाल्मीकि ऋषींचा पालखी सोहळा पुरंदर तालुक्यातील वाल्हे नगरीतून पंढरपूरकडे मोठ्या उत्साहात मार्गस्थ झाला. यावेळी महर्षी वाल्मीकींच्या संजीवन समाधीवर सकाळी आठच्या सुमारास शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत ह.भ.प.बबन महाराज भुजबळ यांच्या हस्ते महाअभिषेक तसेच माउलींच्या जयघोषात ऋषी मंदिराला प्रदक्षिणा देखील घालण्यात आली. त्यानंतर सव्वा नऊच्या दरम्यान ह.भ.प. अशोक महाराज पवार यांच्या नेतृत्वाखाली वाल्मीकींच्या पालखी सोहळ्याची गावातून शोभयात्रा काढण्यात आली.यावेळी टाळ मृदुंगाचा गजर व ज्ञानोबा माउलींच्या जयघोषाने संपूर्ण वाल्हे नगरी अक्षरशः भक्तिसागरात चिंब झाली होती. यावेळी माउलींच्या प्रस्थानानंतर वाल्मीकींच्या पालखी सोहळ्याचे देखील प्रस्थान झाल्याने या पालखी सोहळ्याला जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ.प्राजक्ता दुर्गाडे यांसह वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड तसेच सुवर्णा पवार शंकर भुजबळ धनंजय पवार रमजान आतार मारुती रोकडे चंद्रकांत दुर्गाडे सचिन देशपांडे अमित झेंडे अंकुश शिंदे सुनील पवार व्यापारी संघटनेचे चिमणलाल शहा आदी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली.

### अभिनेता प्रवीण तरडे यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : झोपडपट्टी सुरक्षा दल व महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दला तर्फे देऊळ बंदचे निर्माता अभिनेता प्रवीण तरडे यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दिनांक 18 जुलै 2026 रोजी दुपारी 3 वाजता. गांजवे चौक पत्रकार भवन येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक आणि पानिपत कादंबरीचे लेखक विश्वासराव पाटील यांच्या हस्ते होणार आहे. अशी माहिती झोपडपट्टी सुरक्षा दल व महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी माहिती दिली. या कार्यक्रमात माणुसकीच्या चळवळीच्या संस्थेचे संस्थापक राजू देशमुख, कवियत्री पंचवटी गोंडाळे, यांचा मानचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अभ्यास प्रमुख प्रा. डॉ.सुनील भंडगे, प्रा. आसमा शेख, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

### जेजुरी इसाल एम्प्लॉइज युनियनच्या अध्यक्षपदी पोपट खोमणे यांची निवड



जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त पोपट खोमणे यांची जेजुरी येथील इस्सल एम्प्लॉईज युनियनच्या अध्यक्षपदी बिनविरोध तिसऱ्यांदा यांची निवड झाली आहे. ही निवड 2026 ते 2029 या कालावधीसाठी निवड झाली असता या त्रैवार्षिक युनियनच्या कार्यकारिणीसाठी झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांना देण्यात आली. पोपट खोमणे हे सध्या श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त असून नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार समिती संचालक पदावर त्यांनी काम पाहिले आहे. गेली 21 वर्ष कामगार संघटनेच्या वेगवेगळ्या पदावर त्यांनी जबाबदारी सांभाळलेली आहे तसेच बेडर रामोशी समाज राष्ट्रीय समितीच्या कोर कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे महाराष्ट्रातील रामोशी समाजासाठी सातत्याने वेगवेगळे प्रश्न सोडवण्यासाठी ते गेली पंचवीस वर्षापासून काम करत आहेत.

### 17, 18 रोजी 'ब्रिक 12 ऑन 12' प्रदर्शन

पुणे (दैनिक संध्या) : सातिश मिसाळ एज्युकेशनल फाउंडेशनच्या (एसएमईएफ) ब्रिक ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे 'ब्रिक १२ ऑन १२' या वार्षिक प्रदर्शनाचे आठवे पर्व १७ व १८ जुलै रोजी सारथी सभागृह, भांडारकर रस्ता, शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. वास्तुकला व डिझाइन शिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प, माजी विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा संगम या दोन दिवसीय कार्यक्रमात अनुभवायला मिळणार आहे. १७ जुलै रोजी दुपारी ३.३० ते रात्री ८ या वेळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रकल्पांचे सादरीकरण होणार असून, त्यानंतर ब्रिक वार्षिक प्रदर्शनाचे उद्घाटन होईल.

# 'इस्कॉन' तर्फे श्री श्री जगन्नाथ रथयात्रा महामहोत्सव पुण्यात रविवारी

**आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ - इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे आयोजन ; यंदा तब्बल १ लाख भाविकांना मिळणार महाप्रसाद**

पुणे (दै. संध्या)



जगन्नाथ पुरी येथे साज-या होणा-या रथयात्रा उत्सवाप्रमाणे आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ - इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे आयोजित जगन्नाथ रथयात्रा सोहळ्याला रविवार, दिनांक १९ जुलै रोजी दुपारी १ वाजता टिळक रस्त्यावरील स.प.महाविद्यालय येथून प्रारंभ होणार आहे. ओडिसामधील जगन्नाथ पुरी येथे रथयात्रा मोठया उत्साहात साजरी होते. त्याच पार्श्वभूमीवर पुण्यामध्ये रथयात्रा होणार आहे. रथयात्रेच्या दिवशी इस्कॉन कात्रज-कोंढवा रस्ता, पुणे मंदिरातील भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांना खास दर्शनासाठी रथावर आणले जाते, अशी माहिती इस्कॉन मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला इस्कॉन मंदिराचे जनसंपर्क प्रमुख प्रसाद कारखानीस, स्वागत प्रमुख राधिका विनोद प्रभू, सौम्य निताई प्रभू, अॅड. अभिजित साकुरकर, सहस्र तीर्थ प्रभू, अमर सोनवणे आणि भक्त सेवा प्रभू असे भक्तगण उपस्थित होते.

रथयात्रेचे उद्घाटन इस्कॉन संस्थेचे संन्यासी प.पू. लोकनाथ स्वामी, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, योगेश टिळेकर यांच्यासह पुणे शहरातील सर्व आमदार, नगरसेवक, पुणे महापालिकेतील पदाधिकारी तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते दुपारी १२ वाजता स.प. महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे, असे मंदिराचे उपाध्यक्ष संजय भोसले यांनी सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांची आरती झाल्यानंतर १ वाजता रथयात्रेला प्रारंभ होईल. स.प.महाविद्यालय, अभिनव महाविद्यालय चौक, बाजीराव रस्ता, शनिपार चौक, नगरकर तालीम चौक, लक्ष्मी रस्ता, शगुन चौक, रमणबाग शाळा, ओंकारेश्वर मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, खंडुजीबाबा चौक, टिळक चौक, टिळक रस्ता मार्गे स.प.महाविद्यालय येथे रथयात्रेचा समारोप होणार आहे. ठिकठिकाणी या रथयात्रेचे स्वागत मोठया उत्साहात होणार असून यामध्ये अनेक संन्यासी व महापुरुष सहभागी होणार आहेत. सायंकाळी ७ वाजता आरती, दर्शन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

रथयात्रेतील रथाची उंची २० फूट इतकी असून फुलांसह रंगीबेरंगी कापडांनी रथावर सजावट केली जाणार आहे. हा रथ इस्कॉनचे पदाधिकारी आणि सर्व भाविक ओढणार आहेत.

समारोपानंतर भगवंतांना ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करून आरती होईल. जवळपास २० हजार भाविकांना प्रसाद वाटप महाविद्यालयाच्या प्रांगणात रथयात्रेच्या सुरुवातीला आणि समारोपानंतर होणार आहे. रथयात्रा मार्गावर १ लाख प्रसादाची पाकिटे वाटण्यात येणार आहेत.

रथयात्रेचे समन्वयक श्रीमान अनंतगोप प्रभू म्हणाले, भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा लोकांना दर्शन, आशीर्वाद आणि कृपा देण्यासाठी रस्त्यावर येतात. जगन्नाथ पुरी येथे शतकानुशतके ही रथयात्रा काढली जाते. हा सोहळा साजरा करण्यासाठी जगन्नाथ पुरी येथे लाखो लोक जमतात. परंतु जगन्नाथ पुरी येथे प्रत्येकजण वैयक्तिकरित्या जाऊ शकत नाही. त्यामुळे इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रील भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद यांनी भगवान जगन्नाथाची कृपा जगभर पसरवण्यासाठी रथयात्रा सुरू केली.

पुण्यातील रथयात्रेमध्ये २० हजार भक्त सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक, बंगाल आणि ओरिसा प्रांतातील पारंपरिक वाद्याच्या गजरात हरे कृष्ण महामंत्राच्या घोषात जय जगन्नाथ, जय बलदेव, जय सुभद्रा असा जयघोष करीत रथयात्रा मार्गस्थ होणार आहे. रथयात्रेमध्ये कारंजे आणि हाइड्रॉलिक हत्ती हे विशेष आकर्षण आहे, असे पुजारी कौस्तुभ प्रभू आणि रूप गोस्वामी प्रभू यांनी सांगितले. रथयात्रा ही विश्व शांती आणि भक्तीचा समन्वय आहे. जगाचे स्वामी जगन्नाथ हे मंदिरातून भक्तांना दर्शन देण्यासाठी रस्त्यावर येतात. सर्व नागरिकांनी भगवंतांच्या दिव्य रथयात्रेत सहभागी होऊन त्यांची कृपा प्राप्त करावी, असे आवाहन इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू यांनी केले आहे.

इस्कॉन संस्थेचे पुण्यात कात्रज कोंढवा रस्ता, कँप आणि निगडी येथे मंदिरे आहेत. पुणे शरातील रथयात्रेचे हे १० वे वर्ष आहे. या बरोबरच मंदिरातर्फे विमान नगर, उंडरी, कोथरूड, खराडी, बावधन, विशालनगर, धायरी, शिरूर, शिरवळ, भोर, दौंड आदी ठिकाणी अशाच प्रकारच्या भव्य रथयात्रा पुढील आठवड्यात आयोजित केल्या जाणार आहेत.



## कडेपठार गडावर खंडोबा देवाचा गणपूजा उत्सव धार्मिक उपक्रमांनी साजरा

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाचा धार्मिक दृष्ट्या महत्वाचा असणारा गणपूजा उत्सव जुनागड कडेपठार मंदिरात विविध धार्मिक विधींनी साजरा करण्यात आला. श्री क्षेत्र जेजुरी जयाद्री पर्वताच्या पठारावर असणाऱ्या कडेपठार डोंगर रांगेत श्री मार्तंड भैरवाचे स्वयंभू लिंग असलेले खंडोबा देवाचे जागृत स्थान आहे. पौराणिक काळात भगवान महादेवाने मणी आणि मल्लासूराचा संहार करण्यासाठी कडेपठारावर आषाढ शुद्ध प्रतिपदेला स्वयंभू शिवलिंग रूपाने अवतार घेतला. या दिवशी सर्व ऋषी देव गणांनी कडेपठारावर मार्तंड भैरवाची भंडाराने षोडशोपचारे पुजा केली. या पूजेला गण पूजा असे नाव प्रचलित झाले. अशी माहिती मानकरी माऊली खोमणे यांनी दिली. पौराणिक काळा पासून आजही कडेपठार मंदिरात गणपूजा उत्सव साजरा केला जातो. मंगळवार दिनांक 14 रोजी मध्यरात्री बारा ते दीड वाजे पर्यंत गणपुजे निमित्त पारंपरिक पद्धतीने मानाच्या पूजा झाल्या. गणपूजेचा मानकरी स्थानिक रामोशी खोमणे समाज यांच्या बरोबरच,वीरकर यांची भंडाऱ्याची पूजा, महाजन यांची भाताची पूजा झाल्या नंतर देवाचे पुजारी गुरव,वीर,घडशी कोळी, मानकरी,ग्रामस्थ व हजारो भाविकांनी स्वयंभू लिंगावर भंडारा अर्पण केला. स्वयंभू लिंगावर भंडाराच्या मोठ्या राशी तयार झाल्या, या राशिंवर फुलांची सजावट करण्यात आली. मध्यरात्री दीड नंतर देवाचा छाबिना काढण्यात आला.यावेळी मानकरी घडशी समाजाच्या वतीने सनई चौघड्याचे सोलो वादन, वाघ्या मुरळी व लोक कलावंतांनी देवाचा जागर केला.या धार्मिक विधी वेळी राज्याच्या विविध भागातून हजारो भाविक उपस्थित होते. पहाटे मंदिरातील भंडारांचा प्रसाद वाटून उत्सवाची सांगता झाली.

## चाकण भागातील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था; मोघम गप्पा

चाकण (दै. संध्या)

वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकलेल्या चाकण भागातील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. दमदार पावसामुळे रस्ते मृत्यूचे सापळे बनत चालले आहेत. चाकण पंचक्रोशीतील एकातरी रस्त्यावर दररोज एक तरी अपघात होत असल्याने रस्त्याच्या कामांना प्रत्यक्षात सुरुवात होत नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई - नगर व पुणे नाशिक महामार्गावर चाकण येथील तळेगाव चौक हा अत्यंत महत्त्वाचा आणि प्रचंड वर्दळीचा असून, या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या भागातील रस्ते खड्ड्यात गेले असून, दुरुस्तीच्या कामाला अद्याप मुहूर्त मिळाला नसल्याने अपघाताचा सिलसिला सुरूच राहिला आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता हेच समजत नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. चाकण पासून पुढे शिक्रापूर मार्गाकडे निघाल्यानंतर मेदनकरवाडी, कडाचीवाडी, रासे, भोसे भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. शेलपिंपळगाव येथील नदीवरील धोकादायक वळण अपघाताला निमंत्रण देत आहे. पुलाजवळ रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले आहेत. कोयाळी, वडगाव घेनंद, बहूळ, साबळेवाडी हद्दीतील नागमोडी वळणावर ओव्हरटेकच्या प्रयत्नात अपघात झाले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

## वाढदिवसावरील अनाठायी खर्च टाळून शालेय साहित्यांचे वाटप

चाकण (दै. संध्या)



समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून चाकण येथील उद्योजक मनोहर बापू शेवकरी यांनी त्यांच्या वाढदिवसा वरील अनाठायी खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप केले. स्नेहवन संस्थेमध्ये मनोहर बापू शेवकरी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन केले होते. गेली अनेक समाजातील विविध संस्थांवर कार्य करणारे मनोहर बापू शेवकरी हे चाकण शहरातील एक दानशूर व्यक्तिमत्त्व आहे. वीरांगणा फाउंडेशनच्या वतीने स्नेहवन मधील विद्यार्थ्यांना मोफत लाठीकाठी, तलवारबाजी यांचे धडे देण्यात आले. तसेच कायमस्वरूपी प्रशिक्षण देण्याचे अभिवचन दिले.

सर्प समज व गैरसमज या कार्यक्रमाद्वारे शरदभाऊ गुंड आणि रवी लोहिरे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. बापूंच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विरांगणा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष संजय तांबे, शीघ्रकवी दरेकर आणि मित्रपरिवार, स्व.गुलाबराव गोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास गोरे, चेअरमन रविराज झरेकर, प्राचार्या प्रमिला गोरे, बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष नारायण करपे, विजयकुमार तांबे, कुसुम करपे, आशा चौधरी, डॉ.शैलजा गोरे, मधुसूदन शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमिला गोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# संगीत सेवा म्हणजे कलाकाराचा स्वतःचाच शोध

**ज्येष्ठ बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मजुमदार : भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सतर्फे सन्मान**

पुणे (दै. संध्या)



भारतीय संगीत हे विशाल सागराप्रमाणे आहे. कोणत्याही कलाकाराला संपूर्ण संगीत एका आयुष्यात आत्मसात करणे अशक्य आहे. गायक, वादक किंवा नृत्यकलाकार असो, प्रत्येकाने सर्वप्रथम संगीताचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. संगीत सेवा म्हणजे एक प्रकारे कलाकाराचा स्वतःचाच शोध असतो, असे मत ज्येष्ठ बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सतर्फे पंडित रोणू मजुमदार यांच्या सन्मान सोहळ्याचे तसेच बासरी वादन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे प्रमुख पंडित शारंगधर साठे, पंडित अरुण कशाळकर आदी उपस्थित होते. संगीत नाटक अकादमी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पंडित अरुण कशाळकर यांचा, तसेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल पंडित रोणू मजुमदार यांचा स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सतर्फे सत्कार करण्यात आला. पंडित रोणू मजुमदार म्हणाले, भारतीय संगीत क्षेत्रात गायन ही सर्वश्रेष्ठ कला आहे. प्रत्येक कलाकाराने गायनाचे अंग शिकले पाहिजे. आज अनेक बासरीवादक आणि विद्यार्थी केवळ प्रसिद्ध बासरीवादकांनाच ऐकतात. त्यामुळे त्यांच्या कलेत पूर्णता येत नाही. सर्वसमावेशकता येण्यासाठी प्रत्येक बासरीवादकाने गायनाचे शिक्षण घेणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात संघर्ष अटळ असतो. त्या संघर्षातून मिळणारे अनुभवच कलाकार घडवतात. कलाकार होणे सोपे नसते. शारंगधर साठे म्हणाले, भारती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सने तयार केलेल्या अभ्यासक्रमामुळे गेल्या १८ वर्षांत अनेक गुणी कलाकार आणि विद्यार्थी घडले आहेत. पंडित रोणू मजुमदार यांचे पुत्र ऋषिकेश मजुमदार हेदेखील याच संस्थेचे विद्यार्थी आहेत. संस्थेच्या वाटचालीत पंडित रोणू मजुमदार यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.

पंडित अरुण कशाळकर म्हणाले, कलाकार म्हणून यशाला कोणतीही मर्यादा नसते. मात्र प्रत्येक कलाकाराला स्वतःचे समाधान शोधता आले पाहिजे. पुरस्कार मिळत असतात; मिळाले नाहीत तरी आपल्या कलेचे सादरीकरण करून त्यातून समाधान मिळवणे अधिक महत्त्वाचे आहे. कार्यक्रमात हेमंत जोशी (तबला) आणि कल्पेश (बासरी) यांनी पंडित रोणू मजुमदार यांना साथ-संगत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारंगधर साठे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रवीण कासलीकर यांनी केले.

पंडित रोणू मजुमदार यांनी शास्त्रीय संगीतातील आलाप, जोड, झाला आणि गत वादनाचे तंत्र, त्यामागील विचार व बारकावे प्रात्यक्षिकासह समजावून सांगितले. तसेच रागसंगीत, सुगम संगीत आणि चित्रपट संगीतात बासरीवादनाच्या विविध शैलींचे सादरीकरण करून त्यातील सूक्ष्म पैलू उलगडले. रागाचे चलन जपण्याचे महत्त्व आणि प्रभावी सादरीकरणाची पद्धत याविषयीही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## कायद्याचे पालन करा, गावपातळीवर तंटे मिटवण्यासाठी प्रयत्न करा - न्यायाधीश आर.जी.कुंभार

नारायणगाव (दै. संध्या)




जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथे (दि.१५) रोजी जिल्हा न्यायाधीश - १. तथा जुन्नर तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष एस.बी.शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली "जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत" जुन्नर येथे सकाळी ०९:३० ते १०:३० या वेळेत दिवाणी व फौजदारी न्यायाधिश आर.जी.कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबीरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष. अॅड. निलीमा शेरकर, अॅड. राम कर्पे, अॅड. यु.सी.तांबे, अॅड. विश्वनाथ चव्हाण, अॅड. अविनाश थोरात, अॅड. अरुण गाडेकर, अॅड. शिवम नायकोडी, अॅड. कर्मेश गाडेकर, जुन्नर तालुका विधी सेवा समिती, समन्वयक श्री. प्रशांत मोरतळे तसेच कुमशेत गावचे सरपंच रविंद्र डोके, माजी सरपंच अंबादास डोके तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेतचे शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबीराचे अध्यक्ष दिवाणी व फौजदारी न्यायाधिश जुन्नर आर.जी.कुंभार यांनी कायदेविषयक शिबिराचे औचित्य साधून " नागरिकांनी कायद्याचे पालन करावे नागरिकांनी गावातील तंटे भांडणे गावपातळीवर मिटवून घेण्यासाठी प्रयत्न करावे" असे प्रतिपादन केले.

तसेच आदिवासी समुदायांचे हक्क सरकारी कल्याणकारी योजना आणि मोफत कायदेशिर मदत व सेवा- अॅड. राम कर्पे, मानसिक आजार व बौध्दीक अक्षमता असलेल्या व्यक्तीसाठी कायदेशीर सेवा योजना २०२४- अॅड. यु.सी. तांबे, तसेच नागरिकांचे मुलभुत कर्तव्य- अॅड. विश्वनाथ चव्हाण, पोस्को कायदयाबद्दल जनजागृती- अॅड. अविनाश थोरवे तसेच नालसाच्या राष्ट्रीय विधी सहाय्य हेल्पलाईन व पोर्टलची व्यापक प्रसिद्धी या विषयावर - अॅड.अरुण गाडेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची प्रस्तावना जि.प.शाळा शिक्षक यश घोडे यांनी केले तर सूत्रसंचालन श्याम लोलापोड व आभार प्रदर्शन सरपंच रविंद्र डोके यांनी केली. सदर कायदेविषयक शिबिर मोठया उत्साहात यशस्वीरित्या पार पडले.